# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ५ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


## 'ते' विद्यार्थी फिरले माघारी



। रायगड । खास प्रतिनिधी ।

जालाना येथून सहलीसाठी आलेल्या १७ विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याने विद्यार्थ्यांसोबत असलेल्या शिक्षकांची चांगलीच तारांबळ उडाली. सदर विद्यार्थ्यांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सदरची घटना ४ जानेवारी रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास घडली. त्यानंतर शनिवारी दुपारी विद्यार्थ्यांना सोडण्यात आले. सहलीला आलेले विद्यार्थी हे पुढे नरवीर तानाजी मालुसरे स्मारक, चवदार तळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, रायगड किल्ला यासह अन्य पर्यटनस्थळांना भेट न देताच माघारी फिरले आहेत.

कोकणातील सर्वच प्रेक्षणीय स्थळांची भुरळ सर्वांनाच पडते. विशेष करुन रायगड जिल्ह्याकडे मोठ्या संख्येने पर्यटक आकर्षित होत असतात. डिसेंबर महिन्यात थंडीचा जोर चांगलाच वाढलेला असतो. या कालावधीत परराज्यातून तसेच राज्याच्या विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांच्या सहली येत असतात. न्यू हायस्कूल वरुळ, घाटवड, तालुका जाफराबाद, जिल्हा जालना या शाळेची सहल सिद्धटेक, बारामती, मोरगाव, जेजुरी, नारायणपूर, पान २ वर

■ प्रकृती खालावल्याने सहल राहिली अर्धवट; शिक्षकांची तारांबळ

### उपचार करुन सोडले

शिवकन्या विजय बर्डे (१५), वनिता गजानन साळवे (१५), श्रावणी शालिग्राम देवमाने (१५), तुषार समाधान कस्तुरे (१५), सोहम समाधान सोलाट (१५), ओम परसराम करडे (१५), विशाल भागवत शेळके (९), पायल कवन परिहार (९), संकेत गजानन घुले (९), प्रथमेश गणेश लाहोरकर (१५), शिवानी संजय डोंगरदिले (१५), आरती माधव कर्डेल (१५), समीक्षा सुनील वाकोडे (१५), योगिता कृष्णा शेळके (१५), आरुषी पुरुषोत्तम देवमाने (१३), वैष्णवी शेषराव घायवट (१६), ओम शंकर घायवट (१४), या विद्यार्थ्यांना उपचार करुन घरी सोडण्यात आले.



# अंबा नदी प्रदूषित

■ पालीच्या शुद्ध पाणी योजनेचा राजकारण्यांना विसर
■ नागरिकांसह प्राण्यांचे आरोग्य धोक्यात
■ पाण्यावर प्लास्टिक पिशव्यांसह केमिकलचा तवंग

। धम्मशील सावंत ।
। पाली/बेणसे ।

पालीच्या शुद्ध पाणी योजनेचा राजकारण्यांना नेहमीच विसर पडत आला आहे. शुद्ध नळ पाणीपुरवठा योजना वर्षानुवर्षे लालफितीत अडकून पडली आहे. त्यामुळे विकत घेतलेल्या पाण्यावर महिलांची काटकसर सुरू आहे. आरोग्याच्या दृष्टीने फिल्टर पाणी आवश्यक आहे. त्यामुळे पाणी विकत घ्यावे लागत पान २ वर

> "शुद्ध पाणी योजना कार्यान्वित व्हावी यासाठी ताबडतोब संबंधित विभागाची मीटिंग घेणार आहे. तसेच ज्या कंपन्या रसायनमिश्रित पाणी नदीमध्ये सोडून प्रदूषण करत आहेत त्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे नोटीस पाठवण्यास सांगितले जाईल. अंबा नदीचे पाणी स्वच्छ सुंदर राहील यासाठी सर्वांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे."
> – रविंद्र पाटील, आमदार

### प्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल १६४ जणांना नोटिसा

**पनवेल :** प्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल पालिके कडून १६४ जणांना नोटीस बाजवण्यात आल्या आहेत.या मध्ये नोटिसा इमारती विकसित करणारे विकसक तसेच बेकरी उद्योजक, रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्सचा समावेश आहे. दोन आठवड्यांत सुधारात्मक उपाययोजना न केल्यास त्यांचे कामकाज बंद करण्यात येईल, असा इशारा या नोटीसद्वारे देण्यात आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पालिकेच्या अधिकारक्षेत्रात मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.या तत्वाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी,पालिका क्षेत्रातील बांधकाम साइट्स आणि विकास कामांची तपासणी करण्यासाठी वायु प्रदूषण नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती संबंधित बिल्डर्स आणि डेव्हलपर्सच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीचीही छाननी करेल आणि त्याचा अहवाल आयुक्तांना सादर करेल. समितीमध्ये प्रभाग अधिकारी, उपअभियंता, सहायक नगररचनाकार आणि मुख्य आरोग्य निरीक्षक यांचा पान २ वर




पर्यावरणाच्या रक्षणासाठी पाच लाख किमीची जगभ्रमंती

## ११ देशांची पायी यात्रा करत तरुण रायगडात



। रायगड । खास प्रतिनिधी ।

उत्तर प्रदेशातील चार तरुणांनी ११ देशांमध्ये पायी यात्रा करत तब्बल ४.४८ लाख किलोमीटर इतका प्रवास केला. ते शनिवारी गुजरातमार्गे पालघर, ठाणे, मुंबई येथून रायगड जिल्ह्यात दाखल झाले. त्यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांची भेट घेऊन या यात्रेची माहिती त्यांना दिली. पर्यावरण वाचवण्याचा वसा घेतलेल्या या तरुणांना ५.५ लाख किलोमीटरचा पल्ला गाठायचा आहे. आजपासून पाच दिवस रायगडवासियांना पर्यावरण वाचवण्याचा संदेश देऊन हे ध्येयवादी तरुण पुढील प्रवास करणार आहेत. पान २ वर

### महापुरातून गुरुंना वृक्षाने वाचवले

१९८० मध्ये उत्तर प्रदेशात आलेल्या महापुरात त्यांच्या गुरूंना वडाच्या वृक्षाने आधार देऊन वाचवले होते. तेव्हापासून वृक्षलागवड आणि पर्यावरण रक्षणाच्या प्रचारार्थ त्यांनी जगभरात पायी यात्रेला सुरुवात केली, त्यांच्या आवाहनाला साद देत हे तरुण ही यात्रा पुढे घेऊन जाणार आहेत. या तरुणांनी ११ देशांचा दौरा केला आहे.






## कुर्डूस ग्रा.पं.मध्ये २८ लाखांचा अपहार

■ माजी सरपंचासह ग्रामविकास अधिकारी अडचणीत
■ पोयनाड पोलिसात गटविकास अधिकाऱ्यांची तक्रार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कुर्डूस ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनंत पाटील यांच्यासह ग्रामविकास अधिकारी अडचणीत सापडले आहेत. पदाचा गैरवापर करीत ग्रामपंचायत व केंद्राकडील चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतील २८ लाख ७० हजार ४५८ रुपयांचा अपहार केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला असून, अलिबागचे गटविकास अधिकारी दाईंगडे यांनी दोघांविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार केली असून, त्याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सरपंच भाजप पक्षातील असल्याची माहिती समोर येत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अनंत गोमा पाटील असे या तत्कालीन सरपंचाचे नाव असून, सुनील म्हात्रे असे ग्रामविकास अधिकारी यांचे नाव आहे. १३ नोव्हेंबर २०१९ ते १६ जानेवारी २०२१ या कालावधीत सरपंच व ग्रामविकास अधिकारी पदावर दोघेही असताना त्यांनी पदाचा वापर करीत कुर्डूस ग्रामपंचायत कार्यालयाकडील अभिलेखामध्ये खाडाखोड करून ग्रामपंचायत निधीचा तसेच केंद्राकडून आलेल्या चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतील २८ लाख ७० हजार ४५७ रुपयांचा अपहार केल्याची बाब गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे यांच्या लक्षात आली. त्यांनी सर्व पडताळणी केल्यावर शुक्रवारी रात्री पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास पोयनाड पोलीस ठाण्यात दोघांविरोधात तक्रार दाखल केली. आपल्या पान २ वर

## गळफास घेत व्यापाऱ्याची आत्महत्या

**तळा :** तळा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शनिवार, दि.४ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास घडली आहे. किसन चौधरी (४०) असे आत्महत्या केलेल्या व्यापाऱ्याचे नाव असून, तळा बाजारपेठेत त्याचे ज्वेलर्स व नोव्हेल्टीचे दुकान आहे. शनिवारी किसन चौधरी हा आपल्या कामगारासोबत शेणवली येथील फार्महाऊसवर गेला असता मी थोडा वेळ आराम करून येतो असे सांगून त्याने आपल्या कामगाराला माघारी पाठवले. पान २ वर

## चाकूने केले वार, गुन्हा दाखल

। पनवेल । वार्ताहर ।

वरूण बार कळंबोली येथे जेवणासाठी बसलेल्या चाळीस वर्षीय इसमाला मारहाण करून चाकूने कमरेजवळ आणि दंडावर वार केल्याप्रकरणी श्रीकांत सुरेश निकम आणि अनोळखी ईसमाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



संदीप किसन मुळीक हे सेक्टर ३ इ, कळंबोली येथे राहत असून, त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. ३१ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास मुळीक आणि त्यांचा मित्र अजय हे वरूण बार, कळंबोली येथे जेवण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी श्रीकांत निकम याला कॉल करून माल रेडी झाला आहे, ट्रेलर लोड करून घे असे सांगितल्यानंतर त्याने मी जाणार नाही असे बोलून फोनवर शिवीगाळ केली. त्यानंतर सव्वानऊच्या सुमारास श्रीकांत निकम व त्याचे साथीदार त्या ठिकाणी आले आणि मुळीक यांना लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली आणि चाकूने डाव्या कमरेजवळ व हाताच्या दंडावर वार केले.




# शेतकऱ्यांच्या लढ्यापुढे कॅस्ट्रॉल नमले

## कृषीवलने आवाज उठविताच आंदोलनाची दखल; वारसांना १ फेब्रुवारीपासून कामावर घेण्याचे आश्वासन

**। रसायनी । वार्ताहर ।**

कॅस्ट्रॉल प्रशासनाविरोधात प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी कंपनीच्या गेटजवळ बेमुदत उपोषण सुरू केले होते. याबाबत कृषीवलने आवाज उठविताच कंपनी प्रशासन वठणीवर आले असून, शेतकऱ्यांच्या आंदोलनाची दखल घेत वारसांना १ फेब्रुवारीपासून कामावर घेण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून कृषीवलचे आभार मानण्यात येत आहेत.



याबाबत अधिक माहिती अशी की, पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कैरे गावचे गोविंद हडकु पाटील, जगन्नाथ दामाजी पाटील व अनंता नामदेव पाटील या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची लागवडीखालील जमीन कॅस्ट्रॉल कंपनीला त्यावेळी कारखान्यासाठी दिली होती. कंपनीने शेतकऱ्यांच्या वारसाला कंपनीत कायमस्वरूपी समाविष्ट करू, असे आश्वासनही दिले होते. परंतु, कंपनीने या शेतकऱ्यांच्या मुलांना कायमस्वरूपी कामावर घेतले नाही. त्याबद्दल शेतकऱ्यांच्या वारसांनी सोमवार, दि. ३० डिसेंबर २०२४ पासून कंपनीच्या गेटजवळ वारस वासुदेव गोविंद पाटील, सचिन अनंता पाटील व मंदार भगवान पाटील यांनी त्यांच्या कुटुंबासह बेमुदत उपोषण सुरू केले होते.

गेले तीन दिवस कॅस्ट्रॉल कंपनीच्या विरोधात चालू असलेल्या उपोषणामुळे उपोषणकर्ते वासुदेव गोविंद पाटील, सचिन अनंता पाटील व मंदार भगवान पाटील व त्यांच्या कुटुंबाची तब्येत खालावली होती. यामुळे चर्चा होणे गरजेचे असल्यामुळे खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर व माजी आमदार मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली कॅस्ट्रॉल व्यवस्थापनाशी बैठक घडवून चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये उपोषणकर्त्या शेतकऱ्यांना यश आले असून, शेतकऱ्यांच्या वारसास सध्या कंपनीच्या असलेल्या कॉन्ट्रॅक्टमध्ये एक फेब्रुवारी २०२५ रोजी कामाला घेणार असून, भविष्यात कॅस्ट्रॉल कंपनीमध्ये नोकरभरती झाल्यास सर्व प्रथम शेतकऱ्यांच्या वारसदारांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे चर्चेमध्ये ठरले.

या कॅस्ट्रॉल व्यवस्थापनाशी चार तास झालेल्या बैठकीत तहसीलदार अभय चव्हाण, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर, माजी आमदार मनोहर भोईर, मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, सामाजिक कार्यकर्ते उत्तम भोईर, माजी सरपंच भगवान पाटील, पोलीस पाटील मच्छिंद्र पाटील, लायन ग्रुपचे बाळूशेठ फडके, टायगर ग्रुपचे निळूभाऊ चव्हाण, माजी सरपंच संदीप मुंढे, प्रवक्ते शैलेश सोनावणे, सामाजिक कार्यकर्ते विनोद साबळे, माजी उपसरपंच महादेव गडगे, पँथर आर्मीचे सुशील जाधव, एमआयडीसीचे श्री. राठोड, सचिन दुर्गे, अमित जंगम, सुरेश गावडे व कंपनी व्यवस्थापनाचे जनरल मॅनेजर अजय झा, एचआर मॅनेजर सुनिल टेंबे यांच्यात चर्चा होऊन प्रकल्पग्रस्त शेतकरी वारसांनी उपोषण सोडले आहे.

> कंपनी व्यवस्थापन आणि संबंधित व्यक्ती यांच्यात झालेल्या सकारात्मक चर्चे नंतर, आम्ही त्यांच्या मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोनातून या समस्येवर समाधान शोधण्याचा प्रयत्न केला आहे. परिस्थिती समजून घेत आम्ही संबंधित व्यक्तीला आमच्या पाताळगंगा प्रकल्पामध्ये १ फेब्रुवारी २०२५ पासून कंत्राटी तत्त्वावरील फर्ममध्ये काम करायची ऑफर देऊ केली आहे.
> – प्रवक्ते, कॅस्ट्रॉल इंडिया



# पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सलीम शेख बिनविरोध

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सामाजिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील पत्रकार सलीम मुबारक शेख यांची संघाच्या अध्यक्षपदी सलग आठव्यांदा एकमताने बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

माणगाव तालुका पत्रकार संघाची सभा नववर्षाच्या शुभमुहूर्तावर शनिवार, दि. ४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह माणगाव याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत सन २०२५ या वर्षाकरिता नवीन कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. त्यामध्ये पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील सलीम शेख यांची सलग आठव्यांदा एकमताने बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. संघाच्या कार्याध्यक्षपदी प्रभाकर मसुरे, उपाध्यक्षपदी मजिद हाजिते, निलेश म्हात्रे, प्रवक्तेपदी संतोष गायकवाड, सचिव सचिन देसाई, खजिनदार स्वप्ना साळुंके, मार्गदर्शक उद्योजक खेमचंद मेथा, सल्लागार आजेश नाडकर, तरुण मराठी उद्योजक सुभाष दळवी, कायदेशीर सल्लागार ॲड. केदार गांधी, कार्यकारिणी सदस्य सुप्रिया शिंदे अशी कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. यावेळी आपल्या मनोगतात बोलताना अध्यक्ष सलीम शेख यांनी सुरुवातीला आपल्या सर्व सहकाऱ्यांचे आभार व ऋण व्यक्त केले. ते म्हणाले, गेली आठ वर्षे माणगाव तालुका पत्रकार संघ औषध व फळवाटप, महारक्तदान शिबीर व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान असे विविध कार्यक्रम सातत्याने राबवित असून, यापुढेही आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे कार्यक्रम आपण राबविणार आहोत. सोमवार दि.६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पत्रकार दिनानिमित्त आपण संघातर्फे माणगाव उपजिल्हा रुग्णालयात औषध व फळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले असून, या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले.

# ‘त्या’ लोकसेवकावर फौजदारी कारवाई करा

## हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

हनुमान कोळीवाडा गावाची अधिसूचना रद्द न करता पुनर्वसनाची १५ हेक्टर शेतजमीन वन विभागाला देणाऱ्या सर्व जिल्हा प्रशासनाच्या लोकसेवकांवर फौजदारी कारवाई करा, अशी मागणी हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांची जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे केली आहे. दरम्यान, याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रालय सचिव, जिल्हाधिकारी, कोकण भवन, कोकण आयुक्त, पोलीस आयुक्त नवी मुंबई, प्रांत कार्यालय, तहसीलदार, न्हावा शेवा पोलीस स्टेशन, उरण पोलीस ठाणे, मोरा पोलीस ठाणे आदी ठिकाणी पत्रव्यवहारसुद्धा करण्यात आला आहे.

हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांची फसवणूक करणाऱ्या सर्व जिल्हा प्रशासनाच्या लोकसेवकावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी केली आहे. शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेच्या माध्यमातून सदर समस्या मार्गी लागावी यासाठी पाठपुरावा सुरु आहे. तरी जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून हनुमान कोळीवाडा गावाची दि.१२/०३/१९८७ची अधिसूचना रद्द न करता पुनर्वसनाची १५ हेक्टर शेतजमीन दि.२८/०९/२०२२ रोजीचे अधिसूचनेने वन विभागाला देणाऱ्या सर्व जिल्हा प्रशासनाच्या लोकसेवकावर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या वतीने शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेतर्फे जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहारद्वारे केली आहे.

> जी काही कारवाई केली आहे, ती शासन नियमानुसार झाली आहे. शासनाच्या नियमांचे पालन करूनच सर्व प्रक्रिया पार पडली आहे. आम्ही कोणाचीही फसवणूक केली नाही. कोणावरही अत्याचार केला नाही.
> – उद्धव कदम, तहसीलदार, उरण

> हनुमान कोळीवाडा गावाची अधिसूचना रद्द न करता पुनर्वसनची १५ हेक्टर शेत जमीन वन विभागाला देण्यात आली. यात उरणचे तहसीलदार उद्धव कदम हे पूर्णपणे दोषी आहेत. त्यांनी हे चुकीचे काम केले आहे. तहसीलदार यांनी ग्रामस्थांची फसवणूक केली आहे. तहसीलदार उद्धव कदम यांच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी.
> – रमेश कोळी, ग्रामस्थ हनुमान कोळीवाडा




# पोलिसांकडून विद्यार्थ्यांना प्रशासकीय कामकाजाची माहिती

**। रसायनी । वार्ताहर ।**

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन म्हणून दि.२ ते ८ जानेवारी या कालावधीत पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कार्यक्रम आयोजित करून पोलीस स्थापना सप्ताह साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील पिल्लई एचओसी ऑफ आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज रसायनी येथील विद्यार्थ्यांना शनिवार, दि.४ रोजी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी पोलीस प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती दिली. यात पोलीस ठाण्यातील कामकाजासह रोड सेफ्टी, सायबर क्राईमबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. यावेळी जवळपास १५० विद्यार्थ्यांनी पोलीस कामकाजाबाबत माहिती जाणून घेतली. याप्रसंगी रसायनी पोलीस ठाण्याचे गोपनीय पोलीस राहूल भडाले, शिक्षकवर्गासह विद्यार्थी उपस्थित होते.

# संविधान गुणगौरव परीक्षा संपन्न

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोलीतील वसंत देशमुख मेमोरियल स्कूल, सायन्स अँड कॉमर्स ज्युनिअर कॉलेजमध्ये ‘घर घर संविधान’ या शासन निर्णयांतर्गत संविधान गुणगौरव समितीमार्फत संविधान गुणगौरव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत सहभाग घेतला होता. प्रा. सीमा नाईक आणि अश्विनी वाघुले यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. दरम्यान, लहान गटातून १८७, मध्यम गटातून २९४ असे एकूण ४८१ विद्यार्थ्यांनी संविधान गुणगौरव परीक्षा दिली. या परीक्षेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणून, तर सुनील जाधव यांनी केंद्रप्रमुख म्हणून काम बघितले.




# रक्तदान शिबिरात ६६ बाटल्या संकलित

**। तळा । वार्ताहर ।**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि. ४ ते १९ जानेवारीपर्यंत रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्रात सिकलसेल ॲनेमिया, हिमोफिलीया, पॅलेसेमिआ, ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर पेशंट जास्त प्रमाणात आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्यांना रक्तबाटल्या देण्याच्या उद्देशाने जगतगुरु नरेंद्रचार्य महाराज संस्थानच्या वतीने शहरातील ब्राम्हण समाज हॉल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ६६ रक्तदात्यांनी रक्तदान केले असून, ६६ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी तालुक्यातील नरेंद्रचार्य महाराज संप्रदायाचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## अंबा नदी प्रदूषित

आहे. सुधागड तालुक्यासह खालापूर, रोहा व पेण आदी तालुक्यातून वाहणारी व अनेकांची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीतून पाली शहराला पाणीपुरवठा होतो. तसेच सुधागड तालुक्यातील अंबा नदी शेजारील गावांतील लोक व प्राणीदेखील याच पाण्याचा पिण्यासाठी व वापरासाठी वापर करतात. मात्र, सध्या अंबा नदीचे पाणी निर्माल्य पिशव्या, कचरा, शेवाळ व केमिकलचा तवंग यामुळे प्रदूषित झाले आहे. पाण्यावर शेवाळ व रसायनामुळे हिरवट व लालसर तवंग आला आहे. त्यामुळे तालुक्यातील नागरिक, भाविक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पावसाळ्यानंतर अनेक ठिकाणी बंधारे कार्यान्वीत करुन अंबा नदिचे पाणी अडविले जाते. त्यामुळे या साठलेल्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. तसेच नदीतून वाहून आलेले प्रदूषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. रासायनिक कंपनीमधून टाकऊ रसायन हे थेट अंबा नदीत सोडले जाते. तसेच रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाणदेखील साठते. नदीवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदीत टाकलेले निर्माल्य कुजल्यानेदेखील पाणी खराब होते. परिणामी, ते अधिक दूषित झाले आहे. पाण्याला उग्र स्वरूपाची दुर्गंधी येते, चवही खराब लागते. पाणी प्रदूषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. परिणामी, बहुसंख्य नागरिक अधिकचे पैसे खर्च करुन पिण्याच्या पाण्यासाठी बाटलीबंद पाण्याचा आधार घेतात.

सुधागड तालुक्यातील पाली, राबगाव, आंबोले, रासळ, कानसळ, हेदवली, जांभूळपाडा आदी गावाजवळच अंबा नदीच्या काठावर अनेक रासायनिक व इतर कंपन्या उभ्या राहिल्या आहेत. यातील काही कंपन्यांतील दूषित रसायनयुक्त पाणी थेट अंबा नदीच्या पात्रात सोडण्यात येते. यामुळे तालुक्यातील अंबा नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे जनजीवन धोक्यात आले आहे. अशा काही कंपन्यांवर प्रदूषण नियामक मंडळाने याबाबत योग्य कारवाई करावी.

**– केतन म्हसके, उपाध्यक्ष, शिवऋण प्रतिष्ठान महाराष्ट्र, वावे–सुधागड**

अंबा नदी जॅकवेलजवळ असलेला कचरा ताबडतोब काढून घेण्यात येईल. शुद्ध पाणी योजना लवकरात लवकर यावी यासाठी पाठपुरावा केला जात आहे. नागरिकांनीही नदीचे प्रदूषण होणार नाही याची खबरदारी घ्यावी. पाणी उकळून व गाळून प्यावे. कंपन्यांनी आपले रसायन मिश्रित सांडपाणी थेट नदीत सोडू नये.

**– प्रणाली सूरज शेळके, नगराध्यक्षा, पाली**

**पालीकर व भाविकांना दूषित पाणीपुरवठा**

अंबा नदीच्या पाण्यावर कोणतीही शुद्धीकरण व क्लोरीनेशनची प्रक्रिया न करता थेट पालीकरांना पुरविले जाते. अशा प्रकारे कित्येक वर्षे पालिकरांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. पाली हे अष्टविनायक क्षेत्र आहे. येथे रोज हजारो भाविक येत असतात. पालीची स्थायी लोकसंख्या देखील पंधरा हजारहून अधिक आहे. अशा परिस्थितीत भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे गढूळ व खराब पाणी प्यावे व वापरावे लागत आहे. आत्तापर्यंत येथील नळांतून चक्क जिवंत साप, खुबे, शिंपले, मासे आणि किडे अनेकवेळा बाहेर आले आहेत. गाळ, चिखल आणि शेवाळ येणे हे तर नेहमीचेच आहे. शिवाय पाणीपुरवठादेखील अनियमित होतो.

**शुद्ध पाणी योजनेचा विसर**

पाली शुद्ध पाणी योजना ही १९७४ साली मंजूर झाली आहे. सद्यःस्थितीत तिचा एकूण खर्च आता २७ कोटींवर गेला आहे. मात्र, ही २७ कोटींची शुद्ध पाणीपुरवठा योजना लालफितीत अडकली आहे. राजकीय हेवेदावे आणि प्रशासकीय बाबी यामध्ये ही योजना अडकल्यामुळे पालीकर अजूनही शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. सर्व निवडणुकीच्या प्रचारात सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी व तत्कालीन मंत्री यांनी शुद्ध पाणी योजना कार्यान्वित करू असे आश्वासन देतात. मात्र, अजून काहीच झालेले नाही. प्रशासन व राजकारण्यांना पालीकरांचे हाल दिसत नाहीत. केवळ निवडणुकीपुरते आश्वासन दिले जाते असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

## प्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल १६४ जणांना नोटिस

समावेश आहे. समितीच्या समन्वयासाठी प्रभाग समिती स्तरावरील वायु प्रदूषण नियंत्रण उड्डाण पथक तयार करण्यात आले आहे. त्यात वॉर्ड अधीक्षक, पथक प्रमुख, मुख्य आरोग्य निरीक्षक, प्रभाग अभियंता आणि स्वच्छता निरीक्षकांचा समावेश आहे. प्रभाग समिती सध्या सुरू असलेल्या बांधकाम आणि विकास कामांच्या ठिकाणी भेट देऊन त्याचा अहवाल पर्यावरण विभागाला सादर करेल. हवामानातील बदलांमुळे एमएमआरमधील हवेच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम होत आहे. कमी वाऱ्याचा वेग आणि हिवाळ्यातील तापमान नैसर्गिक वायुवीजन कमी करते. कोरडे वारे आणि ढगाळ हवामानाचा हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो,त्या मुळे आम्ही प्रदूषण रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत, अशी माहिती पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली आहे

## ११ देशांची पायी यात्रा करत तरुण रायगडात

भीमकार्यात पडला नाही खंड

२००१ पासून उत्तर प्रदेशातील जितेंद्र प्रताप, महेंद्र प्रताप, गोविंदा नंद आणि निश्चल मौर्य हे चार तरुण पायपीट करून जगभरातील नागरिकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी निघाले आहेत. त्यांची टीम आता २० सदस्यांपर्यंत पोहोचली आहे. ही टीम सध्या महाराष्ट्राच्या विविध भागातून पादाक्रांत करत आहे. ५.५ लाख किलो मीटर पायी चालून लोकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्याचे भीमकार्यात जराही खंड पडू द्यायचे नाही, असा मनोदय केल्याचे त्यांनी सांगितले.

भारतात ६०० ठिकाणी १४.५० कोटी लावली झाडे

१९८० पासून त्यांचे गुरू अवध बिहारी यांनी उत्तर प्रदेशातून सुरू केलेल्या पदयात्रेच्या माध्यमातून या तरुणांनी भारतात ६०० ठिकाणी १४.५० कोटी झाडे लावली आहेत. पर्यावरणाचे रक्षण करा, झाडे लावा, पृथ्वी वाचवा, नद्यांचे संरक्षण करा, मुली वाचवा–मुली शिकवा, रस्त्याची सुरक्षा, स्वच्छ भारत मिशन असे त्यांच्या जनजागृतीचा मुख्य उद्देश आहे.

## ‘ते’ विद्यार्थी फिरले माघारी

महाबळेश्वर येथून पोलादपूरकडे येत होती. महाबळेश्वर येथे विद्यार्थ्यांनी तेलकट खाद्यपदार्थ खाल्ले त्यासोबतच त्यांनी काही शीतपेय देखील प्यायले यामुळे काही विद्यार्थ्यांना त्रास होत होता. यासोबतच थंड वारे येत असल्याने महाबळेश्वर ते पोलादपूर प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांनी खिडक्या बंद केल्याने विद्यार्थ्यांचा श्वास कोंडला होता. त्रास होत असल्याचे विद्यार्थ्यांनी सदरच्या शिक्षकांना सांगितले. त्यानंतर त्यांना पोलादपूर येथील ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, पोलादपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जाधव, महाड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक शंतनू डोईफोडे, लहान मुलांचे डॉक्टर पुल्ले, डॉक्टर अनिल काकड, डॉक्टर गुठठे, डॉक्टर राजेश शिंदे रूग्णालयात दाखल झाले. पोलादपूर तहसील कार्यालयाचे अधिकारी यांनीदेखील ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. मध्यरात्री एक वाजेपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाकडून देण्यात आली.

## कुर्डूस ग्रा.पं.मध्ये २८ लाखांचा अपहार

पदाचा गैरवापर करीत सर्वसामान्यांच्या हितासाठी आलेला निधी गिळंकृत करणारा सरपंच भाजप पक्षातील आहे. या गुन्ह्यातील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ए.जी. मरस्कोले करीत आहेत.

## गळफास घेत व्यापाऱ्याची आत्महत्या

बऱ्याच वेळापासून मालक आले नाहीत म्हणून पुन्हा कामगार शेणवली येथे पाहायला गेला असता त्याला आपला मालक लोखंडी पाईपाला गळफास लावून घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच तळा पोलिसांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई यांच्यासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला तसेच पुढील कारवाईसाठी मृत व्यक्तीला उपजिल्हारुग्णालय माणगाव येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. किसन चौधरी यांच्या आत्महत्येचे स्पष्ट कारण समजू शकले नाही. या घटनेची तळा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. मिलिंद खिरीट हे करीत आहेत.

# नेत्रचिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**। नागोठणे । वार्ताहर ।**

लायन्स क्लब नागोठणेतर्फे तसेच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या सहकार्याने व दानशूर व्यक्तिमत्त्व असलेले राष्ट्रवादीचे नेते हरिष काळे यांच्या वतीने कै. किसन शिवराम काळे व कै. इंदुमती किसन काळे यांच्या स्मरणार्थ बुधवार, दि. १ जानेवारी रोजी मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले.



या शिबिरामध्ये एकूण ५१ नागरिकांची नेत्रचिकित्सा करण्यात आली. यामध्ये १६ मोतिबिंदू रुग्ण आढळले. मोतीबिंदू असलेल्या सर्वांना पनवेल येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.

या शिबिरास हरिष काळे, नागोठण्याचे माजी सरपंच ला. विलास चौलकर, एमजेएफ ला. विवेक सुभेकर, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष घिसूशेठ जैन, दौलत मोदी, यशवंत चित्रे, लायन्स क्लब अध्यक्ष सुनिल कुथे, उपाध्यक्ष संतोष शहासने, सचिव डॉ. अनिल गीते, सुजाता जवके, दिपक गायकवाड, विनोद सावंत, हरिष काळे यांचे जावई ॲड. निलेश चांदवडकर, रचना चांदवडकर, सखाराम ताडकर, प्रथमेश काळे, सिद्धेश काळे, डॉ. साधना झोलगे, दिपक लोणारी आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, मोफत मोतिबिंदू शिबीर लायन्स क्लब नागोठणेतर्फे दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी घेण्यात येते, तसेच या शिबिराबाबत अधिक माहितीसाठी ९२७०४९९११३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन ला. विवेक सुभेकर यांनी केले आहे.

# आज कर्करोग निदान शिबीर

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

फळसप, ता. म्हसळा येथे दि.५ व ६ जानेवारी २५ रोजी मोफत कर्करोग निदान शिबीर आयोजित केल्याचे उपसरपंच श्रीकांत काशिनाथ विचारे यांनी सांगितले. भास्कर शंकर विचारे ऊर्फ दाजी व भास्कर काशिनाथ विचारे ऊर्फ बापू यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर आयोजित करण्यात आले असून, दि. ७ रोजी सोमजाई जाखमाता सोमेश्वर यात्रोत्सव होणार आहे, असे अजित विचारे यांनी सांगितले. वरील तीनही दिवशी भक्तजनांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जयंत विचारे, बळीराम विचारे आदी ग्रामस्थांनी केले आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **जमिनीची खरेदी व विक्री** अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- **अलिबाग येथे कंस्ट्रक्शन** कंपनी साठी पिकअप वर ड्रायव्हर पाहिजे ८८०६७५९०९०, ९६२३६८७१५७
- वरसोली रायगड आदर्श नगर येथे NA ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेंट- ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३६० मीटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत. १.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्यासाठी योग्य- ९८२२२५७९२९
- Resort + Bunglow. Available fully developed Resort +Bunglow Plot Area 15.1 R Land (with exclusix Access 3.0R) on chondhi kihim Road, just 500 meters from beach, Rate Rs. 30 Lac Per Guntha. Total Lumsum price Rs 4.5 crore. All cheque payment 9822257929.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## निवडक



### शिहू येथे बालिका दिन

**शिहू :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त प्राथमिक केंद्र शाळा शिहू येथे बालिका दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षिका स्वाती पाटील, माने, अंगणवाडी सेविका मीना घासे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली तर काव्या मोकल, आर्या गदमले या विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित ओवी सादर केली. सावित्रीबाई भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. आज त्यांच्यामुळे प्रत्येक स्त्री सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेताना दिसत आहे. समाजातील मुलींचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय बालिका दिन साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश मुलींना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे आणी मुलींच्या शिक्षणाचे महत्व त्यांचे आरोग्य आणि पोषण या बद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे हा आहे. आजही देशात मुलींना विषमता आणी लिंगभेदाला सामोरे जावे लागत आहे अशा परिस्थितीत लोकांची विचासरणी बदलून त्यांना जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय बालिका दिन साजरा केला जातो.



### विज्ञान प्रदर्शनात मानसीचे यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग पंचायत समिती (शिक्षण विभाग),बाबासाहेब नाजरे हायस्कूल,व ज्युनिअर कॉलेज आवास यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले. इयत्ता नववीतील विद्यार्थीनी मानसी पाटील हीने घवघवीत यश संपादन करून विज्ञान प्रदर्शनात तालुक्यामध्ये प्रथम येण्याचा मान मिळविला. मानसी हीची जिल्हा विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या मुख्य विषयांतर्गत विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. नववी ते बारावी च्या गटात झालेल्या विज्ञान प्रदर्शनामध्ये अलिबागमधील नंदा देशमुख हायस्कूलमधील विद्यार्थीनी मानसी किर्तीकांत पाटील ही विद्यार्थीनीने डायल ओळंबा या विषयावर प्रतिकृती तयार करीत स्पर्धेत सहभाग घेतला होता. गुणवत्तेनुसार तिला प्रथम क्रमांक देण्यात आला. गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मानसी पाटील हिने गेल्या तीन वर्षापासून विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेत असून राज्यस्तरिय विज्ञान प्रदर्शनातदेखील गतवर्षी यश संपादन करून अलिबागचे नावलौकिक करतात. मानसीचे आई, वडील क्षयरोग विभागात कार्यरत असून त्यांच्याकडून कायमच मानसीला प्रोत्साहन दिले जात आहे.



### स्वच्छतागृहात ‘कोल्हा’

**पनवेल :** खारघरमधील वास्तुविहार सोसायटी आवारातील स्वच्छतागृहात कोल्हा लपून बसल्याचे मुलांच्या निदर्शनास येताच मुलांनी पालकांना माहिती दिली. दरम्यान, सदर घटनेची वन विभागाला माहिती प्राप्त होताच, तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन वन विभाग कर्मचाऱ्यांनी सदर कोल्ह्याला पिंजऱ्यामध्ये जेरबंद करुन पनवेल परिसरातील निसर्गाच्या सानिध्यात सोडले. खारघर मधील वास्तुविहार आणि सेलिब्रेशन या दोन हौसिंग सोसायटी खारघर सेक्टर-१६ मधील खाडीकिनारा लगत आहेत. बाहेरुन कोल्ह्याने येवून थेट वास्तुविहार सोसायटीच्या आवारात असलेल्या स्वच्छतागृहात प्रवेश केल्याचे बाहेर खेळणाऱ्या मुलांच्या निदर्शनास आले. याबाबत मुलांनी घर गाठून पालकांना माहिती दिली. त्यानंतर पालकांनी वास्तुविहार सोसायटी मधील रहिवासी आणि समीर कदम यांनी माहिती दिली. या माहितीची देखल घेऊन समीर कदम यांनी तात्काळ वन विभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सदर माहिती दिली. त्यानंतर वन विभाग कर्मचारी जगदीश राक्षे, प्रवीण जैस्वाल, सागर माळी आणि खारघर मधील सर्पमित्र रघुनाथ जाधव आदींनी रात्री नऊच्या सुमारास वास्तुविहार सोसायटी आवारातील स्वच्छतागृहात लपलेल्या कोल्ह्याला पिंजऱ्यात जेरबंद केल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

### फेक कंपनी संचालकांना अटक

**पनवेल :** सायबर गुन्ह्यकरीता नामांकित कंपन्यांच्या, गेमिंगच्या, क्रिप्तो वॉलेटच्या फेक वेबसाईट व फेक ॲप बनवून देणाऱ्या तामिळनाडू स्थित कंपनीच्या संचालक आरोपीस पनवेल सायबर सेलने अटक केली आहे. या संदर्भात हॉटेल्सना ऑनलाईन रेटिंग देण्याच्या टास्कमधून चांगली कमाई देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी याची एकूण १९,४३,३८५ ची फसवणूक करण्यात आल्याने वर नमुदप्रमाने न्हावा शेवा पोस्टे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानुसार सदर गुन्ह्याच्या तांत्रिक तपास सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व त्यांचे पथक करीत असताना तामिळनाडूस्थित एका कंपनीने गुन्ह्यात वापरलेली वेबसाईट बनविल्याचे निष्पन्न झाले. सदरची कंपनी ही ब्लॉकचैन डेव्हलपमेंट करणारी असून न्यायालयाकडून सर्च वॉरंट प्राप्त करून सदर कंपनीमध्ये सर्च घेतला असता त्या कंपनीने देशातील नामांकित कंपन्यांची क्लोन वेबसाईट बनविल्याचे तांत्रिक पुरावे मिळून आले. सदर गुन्ह्यात निष्पन्न ०६ आरोपीत यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अटकपूर्व जामिनावर केलेला अर्ज मा. उच्च न्यायालयाने फेटाळला व आरोपी पसार झाले. क्लिष्ट तांत्रिक विश्लेषण करून ०६ पैकी ०२ आरोपी १) सेंथुर पांडियन, वय ३०वर्षे, रा.वैरमणी स्ट्रीट, नर्सिंघम मेन रोड, कडाचनंदल/कटकिनरू, मदुराई,तामिळनाडू. २. तिरुपती अलगरस्वामी, वय ३५, रा. ठी. ३/७७, ईस्ट स्थित, मितुकुंदू, विरुधूनगर, तामिळनाडू मदुराई, तामिळनाडू येथून अटक करण्यात यश आले आहे.

---

#### भाविक, पर्यटक, चालक व स्थानिक हवालदिल; बाह्यवळण मार्गाला मुहूर्त मिळेना

# पालीत वाहतूककोंडीचे विघ्न कायम

**। अमित गायकवाड ।**
**। पाली/वाघोशी ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत नववर्षाच्या स्वागतासाठी तसेच पर्यटणासाठी प्रचंड प्रमाणात भाविक व पर्यटक दाखल होत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या बिकट झाली आहे.

त्यातच मागील अनेक वर्षे येथील बलाप येथून जाणारा बाह्यवळण मार्ग प्रलंबित आहे. परिणामी भाविक, पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांची गैरसोय होत आहे.

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असल्याने नेहमीच येथे भाविकांची गर्दी असते. पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त येत असतात. पालीतील अंतर्गत रस्ते अरुंद आहेत.

बल्लाळेश्वर मंदिर, ग.बा. वडेर हायस्कूल, जुने एस.टी. स्टँड, गांधी चौक, बाजारपेठ, मारुती मंदिर अशा अनेक ठिकाणी नियमित वाहतूक कोंडी होते. हि वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी काही नाक्यावर काही वेळेस वाहतुक पोलीस तैनात असुन देखील अरुंद रस्ते, अवजड वाहतूक, डबर व खडी वाहतूक करणारे डंपर, एकेरी वाहतुकीवरुन दुहेरी वाहतूक आणि वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम न पाळल्याने व रस्त्याच्या दुतर्फा अवैधरित्या पार्क केलेली वाहने यांमुळे पोलीसांना या वाहतूककोंडीवर नियंत्रण मिळविणे अवघड होते. अनेक वेळा वाहतुक कोंडीमुळे रुग्णांना तसेच रुग्णवाहिकेस रुग्णालयात पोहोचण्यास उशिर होतो.

संध्याकाळ नंतर मात्र बऱ्याच वेळा वाहतुक पोलीस तैनात नसतात. तर अनेक महत्त्वाच्या ठिकाणी ते नसतात. आणि यावेळी सुद्धा बऱ्याचवेळा वाहतूक कोंडी होते. आणि कोंडीचा प्रश्न गंभीर बनतो.



**बाह्यवळण मार्ग**

**पाली बाह्यवळण मार्गाला मंजुरी मिळून जवळपास १४ वर्षे झाली आहेत. तरही रस्ता कागदावरच आहे. रस्त्यासाठी १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळूनही कामाला सुरुवात झालेली नाही. वाकण पाली खोपोली राज्य महामार्ग ५४८(ए) व पाली पाटणूस राज्यमार्ग ९४ ला जोडला जाणारा हा बाह्यवळण मार्ग म्हणजे पाली शहरातील सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीवर रामबाण उपाय आहे. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावर बलाप गावावरुन थेट बल्लाळेश्वर मंदिराच्या पाठीमागे झाप गावाजवळ हा बाह्यवळण मार्ग काढण्यात येणार आहे. जमीन हस्तांतरित करण्यासाठी काही शेतकऱ्यांचा विरोध असून त्यांच्या मागण्या शासनाने पूर्ण केलेल्या नाहीत.**

**वाहनांची रेलचेल**

**मुंबई गोवा महामार्गाचे संथ गतीने सुरु असलेले अपूर्ण काम यामुळे येथे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे मुंबई वरून कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळे मार्ग माणगाव वरून किंवा वाकण वरून पुढे जातात. तर कोकणाकडून येणारी वाहने माणगाव वरुन विळे मार्गे पालीतून खोपोली मार्ग पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून अधिक वाहतूक कोंडी होते. बाह्यवळण मार्ग निर्माण झाल्यास हि वाहने पालीच्या बाहेरूनच निघून जातील त्यामुळे हि वाहतूक सुरळीत होऊ शकते.**

> **“भाविक व पर्यटकांची वाहने पालीमध्ये दाखल होत आहेत. त्यामुळे रस्त्यावर कोंडी होताना दिसत आहे. पालीतील महाकाली मंदिर चौक, छत्रपती संभाजीमहाराज चौक असे काही महत्त्वाचे रस्ते रुंदीकरण केले आहे. तर ग. बा. वडेर हायस्कुल व बाजारपेठेत आदी ठिकाणचे रस्त्यावर आलेली बांधकामे मागे घेतली आहेत. आणि रस्ते मोकळे केले आहेत. शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन तसेच सर्व तांत्रिक अडचणी सोडवून बाह्यवळण मार्ग केल्यास पालीतील वाहतूक कोंडी कमी होईल. वाहन चालकांनी देखील नियमांचे पालन करावे.”**
> **- प्रणाली सूरज शेळके, नगराध्यक्षा, पाली**

---

# तंबाखू खाणाऱ्यांना प्रशासनाचा दणका

## ७२ जणांकडून १४ हजार २०० रुपयांचा दंड वसूल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाण्यास बंदी असताना, जिल्ह्यात काही महाभाग बिनधास्तपणे तंबाखूचे सेवन करतात. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आरोग्य विभागामार्फत पोलिसांच्या मदतीने तंबाखू खाणाऱ्यांना दणका देण्यात आला आहे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या ७२ जणांविरोधात जिल्हा प्रशासनाकडून कारवाई करून १४ हजार २०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन रोखण्यासाठी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम रायगड जिल्ह्यात सुरु करण्यात आला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात हे विभाग स्वतंत्र आहे. तंबाखू सेवन करणाऱ्यांना रोखण्यासाठी शाळांपासून गावागावात सरकारी कार्यालयांपर्यंत अनेक ठिकाणी तंबाखू सेवनाच्या परिणामाची माहिती फलकाद्वारे दिली जात आहे. तंबाखू बरोबरबरच धुम्रपानामुळेदेखील आरोग्यावर परिणाम होत असल्याची जनजागृती केली जात आहे. तरीदेखील जिल्ह्यामध्ये तंबाखूसह गुटखा, विमल, सारख्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री जिल्ह्यात ठिकठिकाणी होत आहे. अलिबागपासून वेगवेगळ्या ठिकाणी तंबाखू, गुटखा, व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीची धंदे राजरोसपणे चालत आहेत. त्यामुळे तंबाखू खाणाऱ्यांची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत आहे. तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कर्करोग वाढण्याचा धोका वाढत असल्याचे तज्ञांकडून सांगितले जात आहे. तरीही युवा मंडळी तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी जाऊ लागली आहे. जिल्हा रुग्णालयातील राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मोफत सल्ला देणे. समुपदेशन करणे. मुख कर्करोगाची तपासणी करणे. अशा अनेक वेगवेगळे उपक्रम डॉ. विकास पवार, सुशील साईकर आदीसह उपजिल्हा रुग्णालयामार्फत जनजागृती केली जात आहे.

# आज वधू-वर परिचय मेळावा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील क्षात्रैक्य समाज कुरुळ- अलिबाग संस्थेचा २४ वा वर्धापन दिन रविवारी (दि.५) सकाळी दहा वाजता साजरा करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. या निमित्ताने दुपारी तीन ते सायंकाळी पाच यावेळेत वधु-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक यांनी कळविले आहे.

पहिल्या सत्रात क्षात्रैक्य समाज कुरुळ- अलिबाग संस्थेचा वर्धापन दिन सोहळा पार पडणार आहे. स्वागताध्यक्ष म्हणून वामन पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून बोरीवलीमधील उद्योजक प्रकाश पाटील असणार आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती कृषीभूषण जयंतराव चौधरी व डॉ. रामदास माळी यांची राहणार आहे.

द्वितीय सत्रामध्ये वधूवर परिचय मेळावा होणार आहे. ॲड. समाधान पाटील, राकेश पाटील यांच्या उपस्थितीत हा मेळावा पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

---

# तळ्यात प्लास्टिक पिशवी तपासणी

**। तळा । वार्ताहर ।**

तळा नगरपंचायती मार्फत मुख्याधिकारी मनीषा वजाळे यांच्या आदेशानुसार स्वच्छ भारत अभियान २.० व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत तळा नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांकडून शुक्रवारी तळा बाजारपेठेत प्लास्टिक पिशवी तपासणी करण्यात आली.



तळा नगरपंचायत हद्दीमध्ये व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानात प्लास्टिक पिशव्यांचा माल साठवून ठेवलेला आहे अशा व्यापाऱ्यांचा प्लास्टिकचा माल नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून जप्त करण्यात आला. यापुढे नियमित नगरपंचायत कर्मचाऱ्यांकडून बाजारपेठेत तपासणी करण्यात येणार आहे. व्यवसायिकाकडे प्लास्टिक पिशवी अथवा प्लास्टिक वस्तू सापडल्यास प्रथमतः ५०००रू. दंड करण्यात येणार आहे. पुन्हा त्याच व्यवसायिकाकडे प्लास्टिक पिशवी आढळली तर दुसरा दंड १०००० एवढा आकारण्यात येणार असल्याचे कार्यालयाकडून सांगण्यात आले.

# राकेश लोहार यांना राज्यस्तरीय पुरस्कार

## कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने गुणवंतांचा सन्मान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

स्व. आमदार मधुकर ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट- अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ- रायगड ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवनगौरव राज्यस्तरिय पुरस्कार सोहळा शुक्रवारी सायंकाळी सातिर्जे येथे पार पडला. जिल्ह्यातील ७० हून अधिक गुणवंताचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. दैनिक कृषीवलचे वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार यांनादेखील हा राज्यस्तरिय पुरस्कार आ. भाई जगताप व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत देऊन गौरव करण्यात आला.



ॲड. उमेश ठाकूर यांनी गेल्या अनेक वर्षापासून पुरस्काराची ही परंपरा जपली आहे. राजकीय, सामाजिक, क्रीडा, पत्रकारिता अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कामगिरी बजावणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा कुलाबा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. ही परंपरा त्यांनी आजही जपून जिल्हयातील गुणवंताना प्रोत्साहन देण्याचे काम केले. उमेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत शुक्रवारी सायंकाळी सातिर्जे येथे कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरिय पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. दैनिक कृषीवलचे वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार यांना पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. दरम्यान जिल्ह्यातील दहा कर्तबगार व्यक्तींचा विशेष सन्मान या सोहळ्याप्रसंगी करण्यात आला.

---

# रुफस, डस्टी श्वानांची सुवर्ण कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड पोलीस दलातील श्वान पथकातील रुफस व डस्ट श्वानही कामगिरी बजावत पोलीस दलाचे नाव उंचावत आहे. पालघर येथे झालेल्या १९ व्या कोकण परिक्षेत्र पोलीस दलातील कर्तव्य मेळाव्यात श्वान पथकाची स्पर्धा पार पडली. यामध्ये रुफस व डस्टी या श्वानांनी सुवर्ण कामगिरी बजावली आहे. अंमली पदार्थ व स्फोटक शोधक स्पर्धेत चांगली कामगिरी केल्याने त्यांना सुवर्ण पदक देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सन्मानाने रायगड पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

रायगड पोलीस दलामध्ये दोन हजारहून अधिक पुरुष व महिला अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. उपोषण, मोर्चे, आंदोलनाच्या ठिकाणी बंदोबस्त ठेवण्याचे काम करीत असताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न त्यांच्यामार्फत कायमच होत आहे.

पोलीस दलात श्वान पथक एक स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा कार्यरत आहे. चोरी, घरफोडीसह खून अशा अनेक प्रकारच्या गुन्ह्यातील आरोपींना शोधण्यामध्ये श्वान पथकातील रॉकी, ऑस्कर तसेच रुफस, डस्टी आदी श्वानांनी केले आहे. पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या गुन्ह्यात श्वान पथक मदत करीत आहे. पेण येथे झालेल्या घरफोडीतील गुन्ह्याची उकल करण्यामध्ये मर्फी श्वानाचे योगदान राहिले आहे. महाड येथील खुनाचा गुन्हा ऑस्कर श्वानमार्फत उघडकीस करण्यात आला आहे. त्यामुळे श्वान पथकातील वेगवेगळ्या श्वानांनी कर्तव्य बजावत गुन्ह्यांची उकल करण्यामध्ये मोलाचे योगदान दिले आहे.

पालघर येथे कोकण परिक्षेत्रीय पोलीस दलातील कर्तव्य मेळावा नुकताच पार पडला. या मेळाव्यात श्वानांची स्पर्धा घेण्यात आली. अंमली पदार्थ स्पर्धेत रुफस श्वान व स्फोट शोधक स्पर्धेत डस्टी श्वानने उत्कृष्ट कामगिरी केली.

### लोधीवली येथे राष्ट्रीय बंजारा परिषद

**पनवेल :** बंजारा ज्ञानपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनवेल, रसायनी जवळील लोधीवली येथे ४ ते ५ जानेवारी दरम्यान ‘राष्ट्रीय बंजारा परिषद आयोजित करण्यात आली आहे.

किसन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मगुरु जितेंद्र यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. विलास राठोड यांच्या अध्यक्षतेखाली ‘राष्ट्रीय बंजारा परिषद’ संपन्न होणार आहे. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून ‘राष्ट्रीय बंजारा परिषद’चे प्रदेशाध्यक्ष भिकन जाधव उपस्थित राहणार आहेत.

# राजिप शाळा केंद्राची शिक्षण परिषद

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी आपटे केंद्राची शिक्षण परिषद राजिप शाळा कालिवली येथे संपन्न झाली.सदर शिक्षण परिषद कालिवली शाळा व बागेचीवाडी या दोन शाळांमध्ये आयोजित केली होती.



सुरुवातीला आपटे केंद्राचे केंद्रप्रमुख अविनाश पाटील व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शोभा वाघे, शाळा समिती सदस्य व जरीमरी आई वडापाव सेंटर कालिवलीचे मंगेश म्हात्रे व जळ केंद्रातील ज्येष्ठ शिक्षकवृंद यांच्याहस्ते ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर कालिवली शाळेतील विद्यार्थ्यांनी ईशस्तवन, स्वागतगीताने सर्व शिक्षकवृंदाचे स्वागत केले.

तसेच केंद्रप्रमुखांनी प्रशासकीय विषयावर चर्चा केली. शिक्षकांनी शिष्यवृत्ती पाचवी व संगणक प्रणाली या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी भानुदास पवार यांनी शाळेचे आभार मानून शिक्षण परिषदेची सांगता केली.

---

#### प्रशांत नाईक, प्रदीप नाईक यांची उपस्थिती | कॅलेंडरचा प्रकाशन सोहळा उत्साहात

# ‘इमेज’मधून नव्या पर्यटन स्थळांची ओळख

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वेगवेगळया पर्यटन स्थळी पर्यटक जिल्ह्यामध्ये फिरण्यास येतात. नवनवीन पर्यटन स्थळांसह गडकिल्ले, पुरातन मंदिराची ओळख इमेज कॅलेंडरमार्फत गेल्या सात वर्षापासून होत आहे. सुरु केलेल्या उपक्रमाचे सातत्य राखण्यात आले आहे, असे प्रतिपादन रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक यांनी शुक्रवारी (दि.०३) केले.




इमेज कॅलेंडरच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सभागृहात अलिबागमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, किहीम ग्राम पंचायतीचे सरपंच पिंट्या गायकवाड, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सिनिअर मॅनेजर संदीप जगे, पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, रमेश कांबळे, जितू शिगवण, समीर मालोदे, परिक्षक विजय मयेकर, विकास पाटील आदी मान्यवरांसह पत्रकार, छायाचित्रकार, महिला व तरुण उपस्थित होते.

याप्रसंगी प्रदिप नाईक म्हणाले की, वृत्तपत्रातील छायाचित्रकार रमेश कांबळे, जितू शिगवण व समीर मालोदे या तिघांनी इमेज कॅलेंडरचे सातत्य राखले आहे. भविष्यात छायाचित्रांचे प्रदर्शन भरवण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात यावा, असे आवाहन यावेळी प्रदिप नाईक यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर मालोदे यांनी केले. दरम्यान बारा छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

**प्रशांत नाईक यांच्याकडून कौतूक**

**इमेज कॅलेंडरमध्ये जिल्ह्यातील वेगवेगळ्या पर्यटन स्थळांबरोबरच निसर्ग, गडकिल्ले, तसेच पुरातन मंदिरांची छायाचित्रे आतापर्यंत प्रकाशित करण्यात आली आहे. या छायाचित्रांमुळे नव्या पर्यटन स्थळांची ओळख पर्यटकांना निर्माण होत आहे. यातून पर्यटन वाढीला अधिक चालना देणारा उपक्रम सुरु केल्याने अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्याकडून कौतुक करण्यात आले आहे.**

# आत्मविश्वासाने शास्त्रज्ञ घडतील

## गटविकास अधिकारी संदीप कराड यांचे प्रतिपादन

। खोपोली । प्रतिनिधी ।

**खालापूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे शानदार उद्‌घाटन गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनाच्या उद्‌घाटन प्रसंगी मोजकेच प्रोजेक्ट पाहिलेत किंवा मोठ्या शाळांना, इंग्रजी शाळांनाच म्हणजे त्यांनाच क्रमांक मिळणार असं नाही यासाठी परिक्षक वेगळे ते कोणताही दुजाभाव करणार नाहीत.विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास कायम ठेवल्यास भविष्यात मोठे शास्त्रज्ञ निर्माण होतील असे मोलाचे मार्गदर्शन कराड यांनी केले आहे.**



खालापूर पंचयत समिती शिक्षण विभाग विज्ञान गणित मंडळ व खालापुर तालुका शिक्षण मंडळ प.पू. गगनगिरी महार-ाज इंटरनॅशनल स्कुल खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे खालापूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित केले आहे शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या प्रमुख विषयावर तालुक्यातील विविध शाळांमधील १०२ विद्यार्थ्यांनी विविध प्रोजेक्ट तयार केले आहेत आहेत. याप्रसंगी गटविकास अधिकारी संदीप कराड, गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमोळे खालापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यावाह किशोर पाटील उपाध्यक्ष अबू जळगावकर, राजेश अभणी, शालेय समिती अध्यक्ष कैलास गायकवाड, माजी नगरसेविका जिनी सॅम्युअल, वरिष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास, खोपोली नगरपालिका शिक्षण मंडळाच्या अधिकारी जयश्री धायगुडे, प्राचार्य प्रदीप देशमुख, केंद्र प्रमुख नंदा मोहिते, प्राचार्य गौरव तिव-ारी, सिपला कंपनीच्या अगस्त्य संस्थेच्या धुरी, तालुका विज्ञान अध्यापक सुखदेव आव्हाड उपाध्यक्ष अर्पिता चव्हाण सचिव ज्ञानदेव बीचवर, खजिनदार राजेंद्र गावडे यासह विविध शाळेचे शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रदर्शनात शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान असा आहे त्यामध्ये सात उपविषय दिलेले आहेत. यामध्ये अन्न आरोग्य आणि स्वच्छता, वाहतूक दळणवळण, नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, गणित मॉडेलिंग आणि संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन, संसाधन व्यवस्थापन यांचा समावेश होता. हे विज्ञान प्रदर्शन घेण्यामागचा हेतू आणि पूर्तता करण्यामागचा उद्देश आहे की आपल्यातूनच विद्यार्थी हे शास्त्रज्ञ घडू शसतात त्यांना कुठेतरी प्रोत्साहन मिळावं म्हणून आपण अशा विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन करीत असल्याचे प्रस्ताविकातून विस्तार अधिकारी शिल्पा दास यांनी सांगितले.

विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यासाठीचे यजमानपद आम च्या संस्थेला दिल्याबद्दल कार्यवाह किशोर पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त करीत नवीन तंत्रज्ञान घेवून ग्रामीण भागातील विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनात सहभागी झाल्याबद्दल कौतुक केले. विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.भविष्यात मोठे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करू असे शिक्षणाधिकारी कैलास चोरमोळे यांनी सांगत दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन बघण्यासाठी पालकांनी येण्याचे आवाहन केले.

## बॅटऱ्या चोरी करणारे अटकेत

**पनवेल** : ट्रान्सपोर्टमध्ये वापरत असलेल्या बल्करमधून अज्ञात चोरट्यांनी दोन बॅटऱ्यांची चोरी केल्याची घटना
पनवेलजवळील टी पॉईंट जवळ घडली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोन तरुणांना ताब्यात घेतले असून यातील एक तरुण हा अल्पवयीन मुलगा आहे. यावरील चालक सरोज याने सदर बल्कर उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्यांनी या ठिकाणावरुन ३० हजार रुपये किंमतीच्या दोन बॅटऱ्यांची चोरी केली होती. वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने परिसरात शोध घेतला असता आरोपी ओमकार नायक व त्यांचा अल्पवयीन सहकारी यांची माहिती मिळाली त्यानुसार या दोघांना ताब्यात घेतले.

## लोणेर विद्यापीठात मोफत आरोग्य तपासणी

। माणगाव । वार्ताहर।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे विद्यापीठ प्राथमिक आरोग्य केंद व आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये सीबीसी, आरएफटी, एलएफटी थायरॉईड एचबीए१सी लिपीड आणि शुगर मागील तीन महिन्यांपर्यंत व इतर चाचण्या करण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील पदवी व पदविका विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला.

हे शिबीर यशस्वी करण्याकरीता विद्यापीठाच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समन्वयक डॉ. सोनाली म्हात्रे, डॉ. मंजुषा



नलबलवार व डॉ. त्रिशिला वाघमारे तसेच उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, अधिष्ठाता डॉ. संजय नलबलवार व डॉ. सचिन पोरे व इतर अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने शिबीर संपन्न झाले.

## दारुच्या नशेत तरुण बेपत्ता

**पनवेल** : दारुच्या नशेत राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रशांत प्रभाकर मोरे असे या तरुणाचे नाव असून उंची ५ फुट ५ इंच, बांधा मध्यम, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे, नाक सरळ, डोळे काळे असून अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट व राखाडी रंगाची जिन्स पॅन्ट, तसेच पायामध्ये स्लिपर घातलेली आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मोजे विहूर, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत नुरुद्दीन अ. रज्जाक लसणे, राहणार विहूर, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पूर्ण झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील नुरूद्दीन अ. रज्जाक लसणे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| विहूर ता. मुरूड | २०८/१ | ०-१७-५० एकूण | ३-९१ |

अलिबाग,
दिनांक : ०४/०१/२०२५

सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदारांचे वकील

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे विहूर, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती श्री. रविंद्र अमृतराव थोरात, राहणार विहूर, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकती, सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पूर्ण झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवरील श्री. रविंद्र अमृतराव थोरात, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| विहूर ता. मुरूड | २०८/२ | ०-४६-५० एकूण | १०-३९ |
| विहूर ता. मुरूड | २०९ | ००-२७-३० <br> १०-०१-०० पो.ख. <br> ०-२८-३० एकूण | ४-७५ |
| विहूर ता. मुरूड | २१० | ००-१५-३० <br> ०-००-२० पो.ख. <br> ०-१५-५० एकूण | २-८० |

अलिबाग,
दिनांक : ०४/०१/२०२५

सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदारांचे वकील

### जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहिर नोटीस द्वारे सुचित करणेत येते की, आमचे अशिल श्री. अमित अरविंद मेहेंदळे व श्री. सचिन अरविंद मेहेंदळे यांची आई कै. वर्षा अरविंद मेहेंदळे ह्या दिनांक २२/०७/२०२४ रोजी आजारपणाने मयत झालेल्या आहेत. कै. वर्षा अरविंद मेहेंदळे यांचे नावे खालील नमुद मिळकत आहे.

मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४४९, प्लॉट नं. २, क्षेत्र ३९४-०० चौ. मी., ही प्लॉट मिळकत व त्यावरील ग्रामपंचायत नेरळ घर मिळकत नं. ७३५/१ व ७३५/२ ही स्वप्न बंगला मिळकत.

वर नमुद मिळकतीमध्ये कै. वर्षा अरविंद मेहेंदळे यांचे मृत्युपश्चात आमचे अशिल श्री. अमित अरविंद मेहेंदळे व श्री. सचिन अरविंद मेहेंदळे हेच एकमेव कायदेशिर वारस आहेत. तरी याबाबत कोणाचीही कुठलीही हरकत असल्यास पुराव्यासह ७ दिवसाच्या आत हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस तसा नाहरकत दाखला आमचे अशिलांना देणेत येईल. कळावे.

दि.०५/०१/२०२५

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता- शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१.
मोबाईल नं. ९३२५०६००३७
९०११२९२९८७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती नसरीन तौफिक खान, रा. बी/११०९, शमीम टॉवर, बिल्डींग नं.२, कुर्ला कदम को. ऑ.हौ. सोसायटी, एस.जी. बर्वे मार्ग, कुर्ला (पु.), मुंबई ४०००२४, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| १०९/२ | ०.७५.४० <br> पो. ख. ०.०४.५० | ५.४४ |
| | एकुण ०.७९.९० | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०५/०१/२०२५

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. बाळकृष्ण नारायण शेळके यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १३ | १ | १-८०-२० <br> पैकी ०-४४-०० | २३=२४ |

जिच्या चर्तुसीमा पुढीलप्रमाणे : पुर्वस- स.नं. ११, पश्चिमेस स.नं. १३/१ मधील श्री. पांडुरंग गंगाराम शेळके यांचे २० गुंठे क्षेत्र (खाजगी मोजणीद्वारे तयार केलेले क्षेत्र), दक्षिणेस स. नं. १३/१ मधील श्री. मधुकर गंगाराम शेळके यांचे १० गुंठे क्षेत्र (खाजगी मोजणीद्वारे तयार केलेले क्षेत्र), उत्तरेस - स. नं. ११.

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वाद, दावा, केस वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/०१/२०२५

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे-नागुंर्ले, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णन असणाऱ्या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्क व ताबाकब्जा आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. सदर शेतजमिन आमचे आशिल कायम स्वरुपात विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे - नागुंर्ले, ता. कर्जत, जि. रायगड**

| अ.क्र | कब्जेदाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | दत्ता मोतीराम मोरे उर्फे दत्तात्रेय मोतीराम मोरे | २१ | ४ | १-०४-३ <br> ०-१५-७० <br> १-२०-०० | ८.१६ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- ०४/०१/२०२५

सही/-
**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,
जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड. ४१०२०६.
मो. ९८३३३०६३६१.

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र.अर्ज ९०/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. नरेंद्र लक्ष्मण गंद्रे
रा. बाजारपेठ, रेवदंडा, अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा,
ता.अलिबाग, जि.रायगड सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आजी कै. पार्वतीबाई दशरथ गंद्रे यांचा मृत्यू दि. १२/०५/१९६८ रोजी रेवदंडा येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत रेवदंडा येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवदंडा यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १०/१२/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारीख : १०/१२/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

### जाहीर नोटीस

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत बोजाविरहीत तिचे मालक १) श्रीमती सुंदराबाई नागो ठोंबरे, २) श्री गजानन नागो ठोंबरे, ३) श्री सुरेश नागो ठोंबरे, ४) श्रीमती सरिता बाळू ठोंबरे, ५) कु. कुमकुम बाळू ठोंबरे, ६) कु. साक्षी बाळू ठोंबरे, क्र.५ व ६ तर्फे अ.पा.क. आई सरीता ठोंबरे, सर्व रा. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो व्यवहार माझे अशिलांनी सदरहु मालकांबरोबर ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वाकस, ता. कर्जत, जि. रायगड, येथील शेतजमीन मिळकत**

| भुमापन क्र. | क्षेत्र हे. आर. प्र. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ७०/६ | एकुण क्षेत्र ०.१४.४० हे. आर. प्र. | २.१९ |
| ७०/८ | एकुण क्षेत्र ०.१५.१० हे. आर. प्र. | २.४४ |

या सदरहु मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबात कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

नवी मुंबई
दिनांक ०४/०१/२०२५

सही /-
**ॲड. नवीन वी. धोंगडी**
पत्र व्यवहाराचा पत्ता- फ्लॅट नंबर डी - ४०१,
ग्रिनस्केप रॉयल को.ऑप.हौ.सो.,प्लॉट नं.२५,
सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई - ४१०२०९.
मो.क्र. ९००४०८७८७३

### जाहीर नोटीस

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत बोजाविरहीत तिचे मालक १) श्री रामा उंदराजी वैखरे, २) श्री पांडूरंग उंदराजी वैखरे, ३) श्रीमती नंदाबाई सखाराम डायरे, ४) श्रीमती रखमाबाई दादा पाटील, ५) श्रीमती कांता गोपाळ वैखरे, ६) श्री महेश गोपाळ वैखरे, ७) श्री राजेंद्र गोपाळ वैखरे, ८) श्रीमती रीना रविंद्र भुसारी, ९) श्रीमती निलम अशोक बागडे, १०) श्रीमती योगिता योगेश डायरे, सर्व रा. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्याबाबतचा आवश्यक तो व्यवहार माझे अशिलांनी सदरहु मालकांबरोबर ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वाकस, ता. कर्जत, जि. रायगड, येथील शेतजमीन मिळकत**

| भुमापन क्र. | क्षेत्र हे. आर. प्र. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ६७/४ | एकुण क्षेत्र ०.५०.१० हे. आर. प्र. | ६.३७ |

या सदरहु मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबात कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

नवी मुंबई
दिनांक ०४/०१/२०२५

सही /
**ॲड. नवीन वी. धोंगडी**
पत्र व्यवहाराचा पत्ता- फ्लॅट नंबर डी - ४०१,
ग्रिनस्केप रॉयल को.ऑप.हौ.सो.,प्लॉट नं.२५,
सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई - ४१०२०९.
मो.क्र. ९००४०८७८७३

### ग्रुप ग्रामपंचायत साजगांव
**(महसुली गांवे : साजगांव, ढेकू व सारसन)**
**कार्यालय: मु. पो. साजगाव ता. खालापूर जि. रायगड ४१०२०३**

**जाहीर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत साजगांव ता. खालापूर जि. रायगड येथे १५ वा वित्त आयोग निधी मधून खालीलप्रमाणे कामे करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद लिफाफ्यामध्ये खालील अटी शर्तीना अधिन राहून निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | निधीचा स्त्रोत | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | मोहरबंद लिफाफे निविदा स्विकारण्याचा कालावधी | निविदा उघडणेचा दिनांक | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिण्याच्या पाणीपुरवठा प्रणालीचे संचालन आणि देखभाल करणे | १५ वा वित्त आयोग | १९७८९७/- | १९७८/- | दि. ०६/०१/२०२५ पासून दि. १५/०१/२०२५ पर्यंत | दि. १६/०१/२०२५ | ०३ महिने |
| २ | नवीन पाणीपुरवठा लाईन टाकणे. (मौजे ढेकू येथे पाणी बचतीकरीता वाढीव-विस्तारीत पाणीपुरवठा पाईपलाईन टाकणे) | १५ वा वित्त आयोग | ४६१४३८/- | ४६१४/- | दि. ०६/०१/२०२५ पासून दि. १५/०१/२०२५ पर्यंत | दि. १६/०१/२०२५ | ०३ महिने |
| ३ | पाणीपुरवठा उद्भव विहीर (ठाणेन्हावे) येथे पाणीपुरवठा प्रणाली संचालन व देखभाल संदर्भात आवश्यक कामे करणे. | १५ वा वित्त आयोग | ३९८८८४/- | ३९८८/- | दि. ०६/०१/२०२५ पासून दि. १५/०१/२०२५ पर्यंत | दि. १६/०१/२०२५ | ०३ महिने |
| ४ | सांडपाणी व्यवस्थापनाकरीता गटारे बांधकाम करणे. (मौजे ढेकू येथे) | १५ वा वित्त आयोग | ४०१२००/- | ४०१२/- | दि. ०६/०१/२०२५ पासून दि. १५/०१/२०२५ पर्यंत | दि. १६/०१/२०२५ | ०३ महिने |
| ५ | मौजे ढेकू येथे स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १५ वा वित्त आयोग | ५०००००/- | ५०००/- | दि. ०६/०१/२०२५ पासून दि. १५/०१/२०२५ पर्यंत | दि. १६/०१/२०२५ | ०३ महिने |
| ६ | मौजे साजगाव येथील शाळेमागील बोअरवेलला सौर पंप बसविणे | १५ वा वित्त आयोग | ४८४०००/- | ४८४४/- | दि. ०६/०१/२०२५ पासून दि. १५/०१/२०२५ पर्यंत | दि. १६/०१/२०२५ | ०३ महिने |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१. सदर प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल.
२. निविदा ( मोहोरबंद लिफाफे) स्विकृती अंतिम दि. १५/०१/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंतच असून, अपुर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा (मोहोरबंद लिफाफ्यांचा) कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.
३. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा (मोहोरबंद लिफाफे) नाकारण्याचा अधिकार व निविदा प्रकियेत आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत साजगांवने राखून ठेवला आहे.
४. ठेकेदार नोंदणीकृत व जिएसटी धारक असावा.
५. निविदा मंजुरी अंती ठेकेदार यास रितसर करारनामा करुन द्यावा लागेल.
६. कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करणे बंधनकारक राहील, अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल.
७. बांधकाम करताना वापरावयाच्या वस्तु अथवा साहित्य दर्जेदार व उत्तम प्रतीच्या असाव्यात.
८. ग्रामपंचायतीकडे असणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार कामाच्या देवकातून सर्व शासकीय कपाती वजा करुन देयके अदा केली जातील.
९. कोणत्याही नामंजुर निविदांसंदर्भात निविदा धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

ठिकाण:- साजगांव
जा.क्र. :- ०७/२०२५
दिनांक : ०३/०१/२०२५

सही /-
**(श्री.विनोद चांदोरकर)**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत साजगांव

सही /-
**(श्री.विनोद वा. खवळे)**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत साजगांव

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ जानेवारी

१) श्री.सदाशिशिव ,अलिबाग, श्रीबाग -२,५-१-१९४१

२) श्रीम.हेमा प्रवीण वरसोली, अलिबाग, ५-१-१५०

३)श्री शंकर लक्ष्मण बोभाटे शास्त्रीनगर, अलिबाग ५-१-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# ‘हुतात्म्यांचे स्मरण हीच समितीची भूमिका’

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील दोन क्रांतिकारकांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी बलिदान दिले. घटना कर्जत तालुक्याला अभिमान वाटावी अशी असून, कर्जत तालुक्यात हुतात्मा स्मारक समितीकडून इतिहासाचे स्मरण करण्याचे कार्य अविरतपणे सुरु आहे. तालुक्यातील विद्यार्थ्यांना आपल्या हुतात्म्यांची माहिती व्हावी यासाठी सुरु असलेले कार्य आणि प्रसार प्रचार करण्याची भूमिका महत्त्वाची आहे, असे कौतुक कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केले. भजनभूषण स्व. गजाननबुवा पाटील आणि गीतकार अनंत पाटील यांना हुतात्मा गौरव पुरस्काराचे वितरण हुतात्मा स्मारक समितीच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या ८२ व्या स्मृतिदिनानिमित्त नेरळ येथे हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने सिद्धगड बलिदान दिन सोहळ्याचे आयोजन केले होते. कल्याण कर्जत रस्त्यावरील हुतात्मा चौक येथे आयोजित कार्यक्रमाला आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे, निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत, पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे, माजी सभापती अमर मिसाळ, नेरळ ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर, माजी उपसरपंच मंगेश म्हसकर, निवृत्त जवान कुमार जाधव, किरण कांबरी, अर्जुन शिंदे, चित्रकार पराग बोराडे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती रामचंद्र ब्रम्हांडे, शरद भगत यांच्यासह सायकल पटू हिरेन हिसालके, हुतात्मा गौरव पुरस्कारकर्ते भजन भूषण गजाननबुवा पाटील आणि गीतकार अनंत पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

माजी आमदार सुरेश लाड यांचे हस्ते भजनभूषण गजाननबुवा पाटील यांचा हुतात्मा गौरव पुरस्कार त्यांचे कुटुंबीय प्रसाद पाटील, सुचिता वांजळे आणि संगीता पाटील यांनी मरणोत्तर हा पुरस्कार स्वीकारला. तर गीतकार अनंत पाटील यांच्या कन्या छाया पाटील तसेच अन्य दोन्ही कन्या आणि जावई यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर निवृत्त जवान आणि सर्व शाळांचा हुतात्मा भिडू कोतवाल आणि हिराजी पाटील यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत सामरिक समितीचे विजय मांडे, किशोर गायकवाड, अरुण बैकर, ॲड.जगदीश कराळे, महेश भगत, बंटी शिर्के, नितीन पारधी, हेमंत कोंडिलकर, मनोहर हजारे, सुभाष नाईक आणि अनंत भोईर यांनी केले.

# तटकरे महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन



**। तळा । वार्ताहर ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाचे मनोहर केशव रणदिवे ग्रंथालय, मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाच्या निमित्ताने दि. २ ते ३ जानेवारी असे दोन दिवस ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस संस्थेचे सचिव मंगेश देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के गुरुजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे ग्रंथपाल मनोज वाढवळ, सहाय्यक मंगेश पोळेकर व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या ग्रंथ प्रदर्शनात व्यक्तिमत्त्व विकास प्रेरणादायी ग्रंथ, चरित्र ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, कथा, कविता, कादंबरी, नाटक, साहित्य, मराठी विश्वकोश, वर्ल्ड बुक इनसायक्लोपीडिया, विविध पुरस्कारप्राप्त ग्रंथ व विविध विषयांवरील ग्रंथांचा समावेश करण्यात आला होता. वाचनविषयक आवड निर्माण करणारे विविध उपक्रम संस्थेमध्ये सतत राबवले जातात व त्याचा फायदा हा विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात होतो. या ग्रंथ प्रदर्शनामध्ये एका दिवसामध्ये १२५ ते १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# वाढदिवसानिमित्त वॉटर कुलर भेट

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथील सहाय्यक शिक्षिका तन्मयी शिंदे यांच्या ५० व्या जन्मदिनाचे औचित्य साधून पार्वतीबाई महादेव सोनावणे यांच्या स्मरणार्थ तुषार शिंदे व तन्मयी शिंदे यांच्याकडून नांदगाव विद्यालयास वॉटर कुलर व फिल्टर भेट देण्यात आले. यावेळी सर्व शिक्षकांकडून तन्मयी शिंदे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. नांदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि थंड पाणी मिळावे या हेतूने वॉटर कुलर व फिल्टर दिले.

# शब्दांच्या जादूगाराला वक्तृत्व स्पर्धेतून श्रद्धांजली

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यामधील कोप्रोली गावातील शब्दांचा जादूगार शब्दसम्राट अर्थात प्रसिद्ध निवेदक रत्नाकर गाताडी यांना स्वच्छ भारत सुंदर भारत या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतून श्रद्धांजली वाहण्यात आली.



स्वर्गीय रत्नाकर गाताडी यांना अकरा वर्षांपूर्वी देवाज्ञा झाली आहे. दरम्यान, मागील अकरा वर्षापासून सुयश क्लासेसतर्फे वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून, त्यांना १ जानेवारी रोजी श्रद्धांजली अर्पण करण्यात येते. सुयश क्लासेसचे निवास गावंड हे स्वर्गीय रत्नाकर गाताडी त्यांचे शिष्य आहेत. गुरुला श्रद्धांजली अर्पण करण्याच्या हेतूने निवास गावंड हे अशा प्रकारचे उपक्रम राबवतात. यावेळीही त्यांनी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ भारत सुंदर भारत या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत राजिप शाळा आवरे, जानकीबाई जनार्दन ठाकूर व रामचंद्र म्हात्रे विद्यालय आवरे या शाळेतील २० विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला होता. यात उपासना विनोद गावंड (प्रथम), सृष्टी मच्छिंद्र कडू (द्वितीय), श्रेया कुंदन गावंड (तृतीय) हे विद्यार्थी स्पर्धेचे मानकरी ठरले. त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली. इतर शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी आवरे येथील एसएससी फेब्रुवारी २०२५ च्या विद्यार्थ्यांनाही शुभेच्छा व शैक्षणिक साहित्य देण्यात आले. तसेच शिवमंदिराचे पुजारी धर्मा गावंड यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन निवास गावंड यांनी केले. ज्ञानेश्वर गावंड यांनी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. व्यासपीठावर प्रा. प्रशांत म्हात्रे, रणिता ठाकूर, ज्ञानेश्वर गावंड, श्री. यादव, संदीप म्हात्रे, विनोद गावंड, सुनिल ठाकूर, प्रमोद म्हात्रे, प्रेम म्हात्रे, शंकर पाटील, वामन पाटील, राकेश पाटील, शुभम गावंड, निवास गावंड आदीजण उपस्थित होते.

# सावित्रीच्या लेकींनी समाजोपयोगी कार्य करावे

**। चाणजे । वार्ताहर ।**

देशातील पहिल्या शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षणाची दारे खुली करून महिलांना स्वतःच्या पायावर उभ्या करून स्वाभिमानाने जगण्याचे सामर्थ्य दिले आहे. याची उत्तराई म्हणून आपण सावित्रीच्या लेकी या नात्याने आपण आपल्या परीने समाजोपयोगी कार्य करावे, असे आवाहन उरण सामाजिक, शैक्षणिक व जनजागृती संस्थेच्या उपाध्यक्षा सीमा घरत यांनी केले.



## सीमा घरत यांचे आवाहन


त्यापुढे म्हणाल्या की, महिलांना उद्योग क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे त्या उद्योजिका व्हाव्यात या हेतूने संस्थेतर्फे महिलांसाठी ‘मी उद्योजिका उरणची’ हा व्हॉट्सॲप ग्रुप सुरू करून महिलांना उद्योग क्षेत्रात कार्य करण्याचे प्रोत्साहन व त्यांचे कौतुक करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. विशेष म्हणजे, या ग्रुपवर अनेक महिला उद्योजिकांनी प्रमोशन करून महिला उद्योजक आहेत याची जाणीव करून दिली. सावित्रबाई फुले जयंती व या व्हॉट्सॲप ग्रुपच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महिला उद्योजिकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्षा नीलिमा थळी, सचिव स्मिता पाटील, उपाध्यक्षा सीमा घरत यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. संस्थेच्या संस्थापिका गौरी देशपांडे यांनी प्रास्ताविक केले, तर नीलिमा थळी यांनी स्वागत केले.

यावेळी पीएसआय पद्मजा पाटील यांनी सायबर क्राईम व महिला सुरक्षिततेबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी गोपनीय शाखेच्या पोलीस अधिकारी मानसी तांबोळी व पोलीस बंधू तसेच उपाध्यक्षा कल्याणी दुखंडे, गौरी मंत्री, अफशा मुकरी, दीपा मुकादम, ज्योत्स्ना येरुणकर, नाहिदा ठाकूर, प्रगती दळी, स्मिता पाटील, महिला उद्योजिका विदुला कुलकर्णी व पूनम पाटेकर उपस्थित होत्या.

# साप्ताहिक राशिभविष्य ०५ ते ११ जानेवारी २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## प्रकृतीची पथ्ये पाळा




**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस विद्यार्थ्यांच्या मनात येणारे नकारात्मक विचार दूर करण्याचा त्यांना सल्ला देण्यात येत आहे. तरच सुरूवातीस व अखेरीस विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला होऊ शकेल. आठवड्याचे मधले दोन दिवस वगळता बहुतांशी आपले आरोग्य उत्तम राहील. कंबरदुखी असणाऱ्यांनी जड वजन उचलणे टाळावे हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. आर्थिक नियोजन पूर्ण होऊ शकेल. व्यापारी वर्गाला व्यापाराचे नवे क्षितिज गाठता येईल. घेतलेले निर्णय यशस्वी ठरतील. अंमलात आणलेली गुंतवणूक यांचे समीकरण उत्तम जमेल. नोकरदारांना जास्तीचे काम करावे लागले तरी त्याचा योग्य परतावा मिळेल. नियमांचे योग्य पालन केल्यास कामावर पकड बसेल. पैशाचे गणित लाभदायी ठरेल. अनेक क्षेत्रांत आपला आवाज वरचा राहू शकेल. **महिलांना–** सखेसोबतीसमवेत करमणूक करून आनंद वाढवाल. नात्यातील सलोखा वाढता राहील. मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. जोडीदाराची साथ मिळेल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. प्रकृतीची पथ्ये पाळा. **शुभ दिनांक –** ०५,०६

## आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात



**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता, या सप्ताहात विद्यार्थ्यांनी आपल्याकडील उपलब्धता बघून बसून न राहता अभ्यासात उत्तम कामगिरी करून वाटचाल करावी. एकूण ग्रहमान पाहता, आजूबाजूच्या लोकांचा सहभाग प्रेरणादायी असेल. घराची डागडुजी करून घ्याल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. चंद्राचे प्रतिबिंब जसे सुंदर असते तसेच तुम्ही हाती घेतलेल्या कामाचे स्वरूप प्राप्तिकर वाढवणारे असेल. व्यावसायिकदृष्ट्या असलेली सहनशीलता बदलणारी असेल. अनेक माध्यमांतून लाभ होईल. बौद्धिक क्षेत्रात नवे तंत्र आत्मसात होईल. सरकारी कामकाज वेळेवर पूर्ण होईल. नोकर वर्गाला अधिकार प्राप्त होईल. स्वत:च्या कार्यशाळेचा चांगलाच उपयोग होईल. आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होईल. अडचणीची वेळ निभावून निघेल. समाजमाध्यमाद्वारे तुम्हाला ज्या गोष्टी पोहोचवायच्या आहेत त्या व्यवस्थित पोहोचतील. **महिलांना–** मित्रांकडून मिळालेला सल्ला निश्चित यशाकडे नेणारा असेल. भावंडांना होत असलेला त्रास कमी होईल. घरात एखाद्या आवश्यक वस्तूची खरेदी होईल. भक्तिमार्गात सहज गती येईल. **शुभ दिनांक –**०७,०८

## अपेक्षित फलप्राप्तीत वाढ होईल




**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता, या सप्ताहात हा आठवडा विद्यार्थ्यांना अनुकूल असला तरी त्यांनी इतर प्रवृत्तीत अधिक लक्ष घालू नये. शारीरिक दुखणे कमी होईल. ग्रहांची पकड घट्ट राहील. कामात आलेल्या अडथळ्यांचे प्रमाण कमी होऊ लागेल. आगामी काळासाठी केलेला विचार योग्य ठरेल. अपेक्षित फलप्राप्ती वाढलेली असेल. उत्पन्नातील घटते प्रमाण कमी होईल. ग्राहकांची मने वळवण्यास अनुकूलता राहील. नोकरदार वर्गाने अंगलट येणाऱ्या गोष्टींपासून लांब राहावे. जास्तीची जबाबदारी घेताना विचार करा. नियोजनानुसार स्वरूप ठरवा. आर्थिकदृष्ट्या जपून पावले टाका. राजकीय क्षेत्रातील बैठक पार पाडा. तुमचे वक्तृत्व योग्य दिशा दाखवणारे असेल. व्यसनी मित्रांच्या संगतीपासून लांब राहा. पोलीस, मिलिटरी, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींना धाडसी पराक्रम करावे लागतील. **महिलांना–** इतरांना सल्ला देताना बोलण्यातील जरब धारदार करू नका. कुटुंबातील व्यक्तींची जबाबदारी वाढेल. आरोग्याच्या बाबतीत अजूनही लाल बावटा आहे हे विसरू नका. घाईगडबड व पळापळीने दिनक्रम करू नका. हळुवारपणाने वाटचाल राहू द्या. **शुभ दिनांक –** ०९,१०

## परिस्थिती पाहून निर्णय घ्या




**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जबाबदारीने उचललेले पाऊल यशस्वीरीत्या पार पडेल. निर्माण झालेल्या प्रश्नातून मार्ग निघेल. नोकरदारवर्गाला परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतील. ठरलेला दिनक्रम बदलत जाईल. अनपेक्षित मिळालेल्या लाभातून योग्य गुंतवणूक करा. राजकारणातील वातावरण भडक होऊ देऊ नका. सामंजस्याने तोडगा काढा. नात्यातील गैरसमजाची वाढलेली दरी कमी होईल. खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. चंद्राचे भ्रमण मनाची चंचलता वाढवणारी आहे. तेव्हा सर्वच अपेक्षेप्रमाणे व्हावे. तूर्तास तरी बाजूला ठेवा. व्यावसायिक स्तरावर मोठी कसरत करावी लागेल. सध्या फार मोठी गुंतवणूक करणे टाळा. हिशोबाची नोंद ठेवायला विसरू नका. नोकरीत आकस्मिक घडामोडी होतील. कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करा. अनेक विचार बाजूला ठेवून कार्यमग्न राहा. सामाजिक भान ठेवायला विसरू नका. **महिलांना–** पूर्वी केलेल्या बचतीतून खर्चाचे तंत्र वाढवू नका. वैवाहिक जीवनातील प्रयत्नांना संथ गती मिळेल. कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. **शुभदिनांक –**०५,११

## खर्चावर वेळीच नियंत्रण आणा




**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांनी अभ्यासात घाई करण्याऐवजी धीराने अभ्यास केल्यास त्यांचा अभ्यास चांगला होऊ शकेल. माहीत नसलेल्या गोष्टींवर न बोलणे केव्हाही चांगले. प्रेम प्रकरणापासून लांब राहा. कुटुंबातील एक मत वाढवण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. या काळात न झेपणाऱ्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे टाळा. कोर्ट प्रकरणात स्वतःहून गुंतागुंत करू नका. कला, साहित्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रात स्पर्धा करणे टाळा. व्यवहार क्षेत्रात व्यवहाराच्या नोंदी सूक्ष्म स्वरूपात ठेवा. ग्राहकांची फसवणूक होऊ देऊ नका. नोकरीत कामाव्यतिरिक्त भलताच प्रश्न उभा करू नका. आतापर्यंत पाठीशी असलेले लोक पाठ फिरवत नाहीत ना याचे निरीक्षण करा. मोठ्या खर्चावर वेळीच नियंत्रण आणा. सामाजिक गोष्टीतून नियोजनबद्ध आखणी करून मोठा विकास साधू शकाल. **महिलांना–**संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. जोडीदाराला सुचणाऱ्या कल्पना प्रगतीचे स्वप्न असेल. कौटुंबिक कार्यक्षमता वाढवा. कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. **शुभ दिनांक –**०१,०४

## धाडसी प्रयोग टाळा



**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तिगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. व्यवसायिक क्षेत्रात ग्राहकांच्या असलेल्या मागण्या पूर्ण करण्यास वाव मिळेल. उत्पन्नवाढीचे परिणाम चांगले राहतील. उद्योगधंद्यातील आजवरचा असलेला अनुभव महत्त्वाचा ठरेल. **महिलांना–** वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. थकवा कमी होईल. बोलण्यात शब्दाची लय बदलू नका. प्रगती उत्तम राहील. स्वतःची तब्येत सांभाळून काम करा. **शुभ दिनांक –**०७,०९

## भूलथापांना बळी पडू नका




**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. नोकरीतील विशिष्ट पदासाठी तुमची निवड करण्यात येईल. अनेक प्रश्नांची मालिका उभी राहणार नाही याकडे लक्ष द्या. हातासरशी वाटणाऱ्या गोष्टी अवघड वाटू लागतील. आर्थिक प्रगती उत्तम राहील. सामाजिक क्षेत्रात थोरामोठ्यांच्या गाठी पडतील. मुलांच्या भविष्यासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. एखाद्या मित्राची मोठी जबाबदारी घ्यावी लागेल. भावंडांविषयी किंतु–परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. तब्येतीत सुधारणा होईल. थांबा, पाहा व पुढे जा हे धोरण राबवा. समस्या कमी होतील. ग्रहांची बलवान अवस्था कामातील खाचखळगे कमी करणारे असतील. **महिलांना–** इतरांच्या विचारापेक्षा स्वतःच्या बुद्धिकौशल्याचा वापर करा. दैव अनुकूल राहील. ज्यांना मेदवृद्धी व मधुमेहाची समस्या असेल, त्यांनी प्रकृतीची अधिक काळजी घ्यावी. घरगुती उपकार करत बसू नये. चांगल्या डॉक्टरचा सल्ला घ्या. घरातील वातावरण सुखकारक राहील. **शुभ दिनांक –**०८,११

## उधारीचे व्यवहार बंद करा




**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बुद्धिमत्तेच्या जोरावर व्यवसाय प्रगती साधू शकता. सध्या फार मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवू नका. कमीत कमी तोटा सहन करावा लागणार नाही. शनी संघर्षांतून सकारात्मक दृष्टी वाढवेल. किरकोळ गोष्टीतूनसुद्धा समाधान मिळण्याचे संकेत जास्त वाढू शकतात. संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात तुमचा हातखंडा मोठा असेल. नोकरीच्या समस्या कमी होतील. इतरांकडून घेतलेले हातउसने पैसे परत करून जबाबदारीतून बाहेर पडाल. व्यसनी लोकांपासून लांब राहा. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नियोजन जमेल. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. **महिलांना–** या काळात कौटुंबिक कलह निर्माण करू नका. जितके जमेल तितके शांत राहण्याचा प्रयत्न करा. घरात नवीन वस्तू येईल. बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. धार्मिक कार्यक्रम राबवाल. सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक –** ०९,११

## मोठ्यांचा विश्वास संपादन कराल



**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचा क्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. कर्जफेड कराल. काही ग्रह योग उत्तम आहेत त्याचा फायदा घ्या. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळाचा अंदाज चांगला येईल. अनुकूलतेची चाहूल लागेल, पण ताटात वाढलेले पदार्थ प्रत्यक्षात तोंडात जाईपर्यंत काही होऊ शकते. नोकरदारांना मिळणारा थोरामोठ्यांचा विश्वास यातून चांगल्या गोष्टी घडवण्यासाठी सिद्ध व्हाल. **महिलांना–** भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. वैचारिक मतभेद टाळा. कोणतीही जबाबदारी स्वीकारताना चारही बाजूंनी आवश्यक असणारी खबरदारी घेणे आवश्यक ठरेल. **शुभ दिनांक –**०५,०९

## खर्चावर निर्बंध ठेवा



**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कोठेही कायद्याचे उल्लंघन करू नका. नियोजन अचूक असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वतःचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. स्वत:ला चांगले सिद्ध करू शकाल. खर्चावर निर्बंध ठेवा. या काळात वादविवादापासून लांब राहा. हा सप्ताह व्यापार–व्यवसायाच्या दृष्टीने अपेक्षित अशा क्षेत्रात जाण्यासाठी सोनेरी पायघड्या टाकणारा ठरेल. नोकरदार व्यक्तीने वरिष्ठांशी असलेले संबंध ताणले जाणार नाहीत याची काळजी घ्या. नियोजनबद्ध केलेल्या कामात हक्काचे यश मिळवता येईल. आर्थिक प्रकरणात सरशी होईल, मात्र खर्चावर निर्बंध ठेवा. राजकीय क्षेत्रात विशेष प्रयत्न सत्कारणी लागतील. मित्रांसोबत किरकोळ कुरबुरी मोठ्या स्वरूपात करू नका. **महिलांना–** अतितिखट बोलणे टाळा. कोर्ट प्रकरणात शक्यतो कायदेशीर तडजोडीच्या मागे लागा. या सगळ्यातून वाढणारी जबाबदारी विसरू नका. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभ दिनांक –**०६,११

## व्यवसायात नव्या संधी मिळतील



**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता, या सप्ताहात कष्टाचे प्रमाण वाढवावे लागले तरी फायद्याचे प्रमाणही वाढलेले असेल. स्वत:च्या हिमतीवर महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल. आठवड्याच्या सुरूवातीस या काळात आपल्या व्यावसायिक क्षेत्रात चांगली वाढ मिळेल. जर आपण नोकरी करत असाल, तर तुम्हाला वरिष्ठ आणि कर्मचाऱ्यांकडून खूप पाठिंबा मिळेल. जर तुम्ही तुमचा स्वत:चा व्यवसाय चालवत असाल, तर तुम्हाला परदेशामध्ये किंवा ऑफशोरमध्ये सामील होण्यासाठी काही नवीन संधी मिळतील. यानंतर, आठवड्याच्या मध्याला स्थिती आपल्यासाठी चांगले परिणाम आणू शकते. ज्यांना दीर्घकाळ भागीदारीमध्ये व्यवसायात किंवा गठबंधनमध्ये व्यवसाय सुरू करण्याचा विचार आहे, त्यांच्यासाठीही हा काळ योग्य ठरू शकतो. **महिलांना–** यावेळी आपल्याला आपल्या आरोग्याकडे योग्य लक्ष देणे आवश्यक आहे. आपल्या आरोग्यासाठी योग्य नसलेल्या काही सवयींचा त्याग करण्यासाठीदेखील हा काळ चांगला ठरू शकतो. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक –** २९,३१

## व्यापाऱ्यांसाठी उत्तम काळ



**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात नोकरी करणाऱ्या व्यक्तींना नोकरीत लाभ मिळवून देणारा हा आठवडा आहे. सहकाऱ्यांचे अपेक्षित सहकार्य मिळेल तसेच वरिष्ठांची कृपादृष्टीसुद्धा राहील. व्यापाऱ्यांनासुद्धा आर्थिक लाभ संभवतो. आपण प्रतिस्पर्ध्यांवर मात करू शकाल. सुरवातीस व अखेरीस आपण व्यूहात्मक रित्या वाटचाल करून प्राप्तीच्या नवीन स्रोतांचा विचार कराल. उत्तरार्धात स्वतःसाठी, हौसमौज, वस्त्रे, आभूषणे, मनोरंजन इत्यादींसाठी खर्च होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या मध्यास आपला कार्यभार वाढल्याने थोडा तणाव येऊ शकतो. त्यामुळे कोणताही ठाम निर्णय घेता येणार नाही. ही स्थिती जेमतेम दोन दिवस राहील. प्रणयी जीवनात मागील काही दिवसांपासून आपण ज्या अडथळ्यांचा किंवा प्रतिकुलतेचा सामना करत होता ती आता दूर होईल. आपल्या सामाजिक संबंधातील सान्निध्य यश देणारे ठरेल. **महिलांना–** व्यवसायात नवीन संबंध सुरु होण्यास विलंब झाला तरी निश्चितपणे चांगल्या परिणामाची अपेक्षा बाळगू शकता. उत्तरार्धात विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची किंवा विवाहितांना जोडीदाराचा उत्तम सहवास मिळण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक –**०८,०९

# धारावी पुनर्विकास प्रकल्प:

## इतिहास, आक्षेप, राजकारण व निराकरण

वायूवेग

मुंबई हे देशातील मोठ्या शहरांपैकी एक व बहुसांस्कृतिक शहर आहे. तसेच हे शहर देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाते. भारताच्या सर्व राज्यातून आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी लोक मुंबईत आलेले आहेत. मायानगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहरात दक्षिण मुंबईतील टोलेजंग इमारती दिसतात तशी मुंबईत जगातील तिसरी मोठी व आशिया खंडातील सर्वात मोठी म्हणून ओळखली जाणारी धारावी झोपडपट्टीही दिसते.



एका वर्तमानपत्राच्या वृत्तानुसार १८८२ सालात ब्रिटिशांनी मुंबईतील मजुरांना राहण्यासाठी स्वस्त दरात निवारा उपलब्ध व्हावा म्हणून ही वस्ती वसवली. हळूहळू येथे लोकांची वस्ती वाढत गेली आणि आजच्या स्वरूपात ही वस्ती आलेली आहे. मुंबईच्या मध्यभागी पसरलेल्या या वस्तीत सुमारे सहा ते दहा लाख लोकसंख्या ही अत्यंत घाणेरड्या, कोंदट जागेत राहत आहे. तेथील अरुंद रस्ते आणि बेकायदेशीर अनियोजित बांधकामे यामुळे तो परिसर नागरी सुविधा मिळण्यासाठी गैरसोयीचा बनलेला आहे. धारावीच्या अशा रचनेमुळे अनेक बेकायदेशीर धंदे व गुन्हेगारांना आश्रय देणारी ती जागा बनली आहे. या धारावीच्या पुनर्विकासासाठी अनेक सरकारांनी प्रयत्न केले पण राजकारणी व गुन्हेगारी जगतातील लोकांनी हा प्रकल्प होऊ दिला नाही. आता मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा महत्त्वाकांक्षी स्वप्नवत वाटणारा प्रकल्प पूर्ण होईल अशी चिन्हे दिसत आहेत.

**काय आहे धारावी पुनर्विकास प्रकल्प?**

धारावी पुनर्विकास प्रकल्प हा मुंबईच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. यात धारावीतील झोपड्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना त्यांच्या हक्काचे नवेकोरे, सुनियोजित गृहसंकुलात घर मिळणार आहे. यामुळे त्यांचे राहणीमान सुधारणार आहे. त्याचबरोबर तेथील व्यावसायिक आस्थापना व कुटीरोद्योग यांचेही पुनर्वसन व पुनर्विकास होणार आहे. २००० सालाच्या आधीपासून राहणाऱ्या कुटुंबांना ३५० वर्गफुटाचे घर मिळणार आहे. जे मुंबईतील इतर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात मिळणाऱ्या घराच्या क्षेत्रापेक्षा १७% अधिक आहे. विशेष म्हणजे या घरांच्या मालकांकडून पुढील १० वर्षे देखभालशुल्क घेतले जाणार नाही. या प्रकल्पात सदनिकाधारकांना स्वतंत्र शौचालये, पाणी व वीज यासारख्या प्राथमिक नागरी सोयी २४७ पुरवल्या जाणार आहे. तसेच शाळा-महाविद्यालये, रुग्णालये, व्यापारी संकुले अशा सोयी सुविधांचाही तेथे विकास होणार आहे. एकूण क्षेत्राच्या सुमारे ४५ ते ५०% जागा नागरी सुविधांसाठी आरक्षित केली जाणार आहे. ज्यात १८% जागा रस्त्यांनी व्यापली जाईल व १७% जागा हरित क्षेत्र म्हणून राखून ठेवण्यात आली आहे. तसेच एकूण बांधकाम क्षेत्राच्या १०% एवढा भाग व्यावसायिक वापरासाठी राखून ठेवला जाणार आहे. त्यातून निर्माण होणारा निधी एका सक्षम प्राधिकरणाच्या अंकित राखून ठेवला जाणारा आहे. ज्याचा उपयोग भविष्यातील देखभाल खर्चासाठी होऊ शकेल. काय आहे या प्रकल्पाचा इतिहास?



पूर्वी वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना केवळ अनधिकृत असल्याचे मानून झोपडपट्ट्यांवर कारवाई करण्याचे धोरण बदलून मानवतावादी दृष्टिकोनातून गलिच्छवस्ती पुनर्वसन करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले होते. त्यातून मुंबईतील मुंबईतील गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ करण्यात आला. पण राजीव गांधींच्या पंतप्रधानपदाच्या कालावधीत झालेला अयशस्वी प्रयत्न सोडता काँग्रेस सरकारांच्या काळात धारावीच्या पुनर्विकासाबाबत पुढे विशेष असे काही घडले नाही.

१९९५ मध्ये भारतीय जनता पार्टी व शिवसेना युतीचे मनोहर जोशी यांच्या नेतृत्वातील शासन सत्तेवर आले. या शासनाने मुंबईच्या विकासावर लक्ष केंद्रित केले. पायाभूत सोयीसुविधांचे अनेक प्रकल्प या काळात सुरू झाले. विशेषत: मुंबईची वाहतूक कोंडी कमी करणारे काही प्रकल्प मुंबईच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे होते. मुंबईतील ५५ उड्डाणपूल, पुण्याला जोडणारा जलदगती महामार्ग, वांद्रे ते वरळी सागरी मार्ग तसेच मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत अनेक प्रकल्प शासनाने हाती घेतले. झोपडपट्टी पुनर्वसन हा युती सरकारच्या वचननाम्यातील प्रमुख मुद्दा होता. त्यामुळे या विषयाचा अभ्यास करण्यासाठी सनदी अधिकारी दिनेश अफजलपुरकर यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासगटाची २७ एप्रिल १९९५ ला स्थापना करण्यात आली. या अभ्यासगटाने आपला अहवाल २० जुलै १९९५ ला शासनाकडे सुपूर्द केला. या अहवालाच्या अनुषंगाने गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यामध्ये सुधारणा करण्यात आली. अहवालातील शिफारसींच्या आधारे १६ डिसेंबर १९९५ ला शासनाने गलिच्छवस्ती (झोपडपट्टी) पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्थापनेची अधिसूचना काढली. २५ डिसेंबर १९९५ ला गलिच्छवस्ती सुधारणा, निर्मूलन, पुनर्विकासासाठी ते नियोजन प्राधिकरण म्हणून अस्तित्वात आले. धारावी पुनर्विकासासाठी २०१८ व २०२२ ला याच प्राधिकरणाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय निविदा मागवण्यात आली.

पुढे १९९९ ला महाराष्ट्र विधानसभेची निवडणुक होऊन युतीचे शासन गेले व काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे शासन सत्तेवर आले. युती शासन सत्तेवरून जाताच धारावी पुनर्विकास प्रकल्प लालफितशाहीत अडकला तसेच या विषयात पुष्कळ राजकारणही झाले. ज्यांचे हितसंबंध धारावी दुरावस्थेतच राहू देण्यात होते त्यांनी हा प्रकल्प होऊ दिला नाही. राजकीय इच्छाशक्तीचीही कमतरता होती.

२०१४ मध्ये राजकीय क्षितिजावर मोठे परिवर्तन झाले. केंद्रामध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात पूर्ण बहुमताने भारतीय जनता पार्टीचे शासन आले. त्यापाठोपाठ महाराष्ट्र विधानसभेत भारतीय जनता पार्टी सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आणि देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री बनल्यानंतर त्यांनी अनेक महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतल्या त्यात धारावी पुनर्विकास प्रकल्पही होता.

२८ नोव्हेंबर २०१८ मध्ये धारावी पुनर्विकासासाठी आंतरराष्ट्रीय निविदा मागवण्यात आली. त्यात दुबईस्थित यांनी सर्वोच्च बोली लावली होती. पुढे २०१९ मध्ये अपघाताने म्हणा किंवा विश्वासघाताने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शासन सत्तेवर आल्यानंतर त्यांनी ही निविदा रद्द केली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने पुन्हा निविदा मागवण्यासाठी अटी व शर्ती निश्चित केल्या. पण एकनाथ शिंदे यांच्या बंडाने उद्धव यांची राजवट संपुष्टात आली. सत्तेवर आल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील आणि देवेंद्र फडणवीस यांची भक्कम साथ असलेल्या शासनाने उद्धव ठाकरे यांच्या काळातील रखडलेले वा रद्द झालेले प्रकल्प गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेतला व या प्रकल्पाची पुन्हा निविदा काढली. या स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत यांनी बाजी मारली. त्यांनी ५०६९ कोटी रुपयांची सर्वोच्च बोली लावली आणि १७ जुलै २०२३ ला त्यांना कार्यादेश मिळाले. त्यांनी आजपर्यंत ३०००० घरांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे आणि ७५००० घरांसाठीची प्रक्रिया सुरू आहे.

**कोण गेलं न्यायालयात?**
**काय होता आक्षेप?**

यांना कार्यादेश मिळाल्यानंतर दुबईस्थित या कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली. याच कंपनीने २०१८ च्या निविदा प्रक्रियेत सर्वोच्च बोली लावली होती. आपल्या याचिकेत ने निविदा प्रक्रियेत घालण्यात आलेल्या अटी-शर्तींवर आक्षेप नोंदवले होते. त्यांचा दावा असा होता की की, एका विशिष्ट समूहाला फायदा होण्यासाठी अटी-शर्ती घालण्यात आल्या. परंतु न्यायालयाने त्यांचे दावे व याचिका फेटाळून लावली. फेटाळून लावताना न्यायालयाने कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणेच्या अटी-शर्ती तयार करण्याच्या अधिकारात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. तसेच निविदा प्रक्रिया ई माध्यमाद्वारे स्पर्धात्मक पद्धतीने झाल्यामुळे त्यातही काही हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

**ठाकरे व विरोधकांचे राजकारण व देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले उत्तर**

अदानी समूहातील कंपनीला हे काम मिळाल्यानंतर नेहमीप्रमाणे उद्धव ठाकरे व त्यांच्या पक्षाने प्रकल्पात खोडा घालण्याचा प्रयत्न केला व मुंबई अदानी समूहाला विकली असा आरोप करून धारावीचा विकास रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु हे लक्षात घ्यायला हवे की, ठाकरे यांच्या मंत्रीमंडळाने तयार केलेल्या अटी-शर्तींवर ही निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. यात केवळ एक बदल करण्यात आला. अदानी समूहाला अमर्याद हस्तांतरणीय विकास हक्क देण्याची अट बदलून त्यावर मर्यादा लावण्यात आली. जास्तीत जास्त एकूण मूल्याच्या ९०% एवढ्या मर्यादेतच विकास हक्क हस्तांतरित होतील. तसेच या विकास हक्कांची अंमलबजावणी ई-प्लॅटफॉर्ममार्फत होईल. ठाकरे यांनी तयार केल्या अटी-शर्तींवर ही निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असती तर खरोखर मुंबईच्या बांधकाम क्षेत्रावर अदानी समूहाचे नियंत्रण आले असते. त्यामुळे ठाकरेंचा आक्षेप हा केवळ राजकारणाचा भाग आहे हे दिसून येते. या प्रकल्पासाठी नावाने एक विशेष उद्देश वाहन कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र शासनाची भागीदारी व नियंत्रण आहे. त्याकडे धारावी पुनर्विकासाचे काम असेल व त्यांच्याचकडे हस्तांतरणीय विकास हक्क जातील.

तसेच ठाकरे शासनाने या प्रकल्पात ७०,००० घरांचेच पुनर्वसन व पुनर्विकास होणार अशी योजना बनवली होती, तथापि हजारो कुटुंबांवर अन्याय होईल, तसेच धारावीच्या प्रश्नाचे समूळ उच्चाटन होणार नसल्याने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या शासनाने महत्वाकांक्षी अडीच लाख घरांच्या पुनर्विकासाचा हा प्रकल्प आखला. ठाकरे व त्यांच्या पक्षाने या मुद्द्यावर राजकारण करण्याचा प्रयत्न केला असला तरी आता जनता त्यांच्यासोबत नाही हे आता स्पष्ट झाले आहे. या मुद्द्यावर त्यांनी काढलेल्या मोर्चामध्ये पूर्ण मुंबईतून संख्या जमवूनही ४००० पेक्षा अधिक लोकांची गर्दी नव्हती, हे त्याचेच द्योतक आहे.

**उद्धव ठाकरे यांचा विकास विरोधी इतिहास**

उद्धव ठाकरे यांनी वेळोवेळी विकास विरोधी भूमिका घेतली आहे. मुंबईतील मेट्रो प्रकल्प, नाणार रिफायनरी प्रकल्प, वाढवण बंदर प्रकल्प व धारावीचा पुनर्विकास प्रकल्प या सर्वांमध्ये खोडा घालण्याचे काम केले आहे. ते सत्तेत असताना रखडलेल्या प्रकल्पांमुळे प्रकल्प किंमत वाढून शासनाचे पर्यायाने जनतेचे नुकसान झालेले आहे. शिवाय प्रकल्पात दिरंगाई झाल्यामुळे झालेले नुकसान न भरून येणारे आहे. विरोधी पक्षात राहून लोकांना अशा प्रकल्पांच्या विरोधात भडकवण्याचे काम ठाकरे यांनी वेळोवेळी केले आहे. परंतु जनता आता याला बळी पडत नाही ही चांगली बाब आहे. **

---

**माजी पंतप्रधान, ख्यातकीर्त अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन ही भारताची फार मोठी हानी करुन गेलेली दुर्दैवी घटना म्हणावी लागेल. स्वातंत्र्योत्तर भारतामधील आर्थिक व्यवस्थापनातील एक सर्वांगीण आणि परिपक्व अर्थप्रशासक असणारे हे एक महनीय व्यक्तिमत्त्व होते. अर्थकारणाशी संबंधित महत्त्वपूर्ण असणारी सगळी धोरणात्मक पदे त्यांनी भूषवली होती. देश त्यांचे नेहमीच स्मरण करेल.**

# देशाने महत्त्वाचा मोहरा गमावला



अभय टिळक

डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन हा आपल्याला बसलेला फार मोठा धक्का आहे. त्यांची प्रदीर्घ कारकीर्द देशाला एका आश्वासक वळणावर घेऊन गेली, असे आपण खात्रीपूर्वक म्हणू शकतो.

त्यांच्या कारकीर्दीचे दोन टप्पे केले तर पी.व्ही. नरसिंह राव यांच्या काळातील त्यांची कारकीर्द आणि भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी केलेले काम यात बरीच महत्त्वपूर्व वैशिष्ट्ये बघायला मिळतील. मात्र मला जाणवणारे म हत्त्वपूर्ण वैशिष्ट सांगायचे तर सिंग हे स्वातंत्र्योत्तर भारतामधील आर्थिक व्यवस्थापनातील एक सर्वांगीण आणि परिपक्व अर्थप्रशासक होते. इथे आपण हेदेखील लक्षात घ्यायला हवे की त्यांनी अर्थकारणाशी संबंधित महत्त्वपूर्ण असणारी सगळी धोरणात्मक पदे भूषवली होती. पण आधी वाणिज्य मंत्रालयामध्ये (मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स) आर्थिक सल्लागार होते. त्यानंतर पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, केंद्रीय अर्थसचीव, त्यानंतर केंद्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, अर्थमंत्री, युनायटेड नेशन्सच्या ट्रेडमध्ये भारताचे प्रतिनिधी, साऊथ कमिशनचे सेक्रेटरी अशी नानाविध पदे भूषवणाऱ्या मनमोहन सिंग यांची कारकीर्द मात्र अध्यापनापासून सुरू झाली होती. खरे तर हीच एक दुर्मीळ बाब आहे. कारण अध्यापनाचे काम करणाऱ्यांची विचार करण्याची पद्धत थोडी वेगळी असते. असे असतानाही सिंग यांनी अर्थप्रशासक म्हणूनही सगळी पदे भूषवून सर्वोत्तम कामगिरी करावी हे विलक्षण आहे. अर्थातच या सगळ्यामुळे त्यांच्याकडे प्रचंड अनुभव होता. आता तो खचितच कोणाकडे बघायला मिळेल. या अनुभवानेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्रगल्भ आणि सर्वांगीण विचारांची चौकट दिली होती ज्याचा लाभ संपूर्ण देशाला झाला.

इथे पी.रंगराजन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर असल्याचा काळ स्मरतो. पूर्वी राज्यांची तूट वाढली की ते रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घ्यायचे. मात्र याला काहीतरी मर्यादा असणे आवश्यक होते. हे लक्षात घेत उत्तम अर्थप्रशासक असणाऱ्या डॉ. मनमोहन सिंग आणि रंगराजन या दोघांनी एक महत्त्वपूर्ण सुधारणा केली. त्यानुसार उत्पन्नाच्या विशिष्ट टक्केवारीइतकीच उचल राज्यांना घेता येण्याची तरतूद करण्यात आले जे पुढे धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले कारण यामुळे आपोआपच राज्यसरकारांच्या वित्तीय व्यवस्थापनाला शिस्त लागली. खर्च करताना हात सैल सोडायचा आणि रिझर्व्ह बँकेकडून हवे तेवढे कर्ज घेऊन नंतर खड्डे भरत राहण्याची चुकीची पद्धत यामुळे बंद झाली.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या गेल्या. त्यातील पहिली महत्त्वपूर्ण अशी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना होती. त्यानंतरचा अन्न सुरक्षा कायदाही अत्यंत महत्त्वाचा होता आणि जवाहरलाल अर्बन रिन्युअल मिशनचेही वेगळे वैशिष्ट्य होते. या सगळ्या योजनांच्या माध्यम ातून प्रथमच केंद्राच्या पातळीवर शहरी आणि ग्रामीण भारताचा संतुलित विचार झालेला दिसला. डॉ.मनमोहन सिंग राजकारणाच्या क्षेत्रात वावरले. मात्र हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, अर्थकारणावर नेहमीच राजकीय गणितांची मात होत असते. असे असूनही डॉ. सिंग मनाविरुद्ध झालेल्या प्रत्येक निर्णयांचे वा आर्थिक धोरणांचे दूरगामी परिणाम आपल्या अत्यंत सौम्य पण स्पष्ट शब्दांमध्ये, पटेल अशा पद्धतीने मांडत राहिले. त्यांचे हे कामही महत्त्वपूर्ण म्हणावे लागेल कारण यासदेखील वेगळ्या प्रकारचे धैर्य लागते. जसे की, आपण केवळ ग्रामीण भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांनाच अन्नसुरक्षा कायदा लागू करु, असे ते शेवटपर्यंत सांगत होते. मात्र त्यावेळी डाव्या पक्षांच्या आधारावर सरकार उभे असल्यामुळे सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या नॅशनल ॲडव्हायझरी कौन्सिलमध्ये हा कायदा रेटला गेला आणि ग्रामीण भारताबरोबरच शहरी भागही योजनेत समाविष्ट करुन घेतला गेला. मात्र ही बाब आपल्याला फार काळ तारणार नाही आणि अर्थकारणावर याचे गंभीर परिणाम काही काळातच दिसून येतील, हे सिंग यांचे मत काही काळातच सिद्ध झाले. त्यांचे असे अनेकांचा विरोध पत्करुन आपले मत मांडत राहणे, मला महत्त्वाचे वाटते. याद्वारे त्यांनी अर्थशास्त्र आणि त्यातील मूल्यांशी बांधिलकी राखण्याचे काम केलेच खेरीज आपले विचार न घाबरता राजकीय व्यासपीठांवर व्यक्त करण्याचे कामही केले. त्यामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे वैशिष्ट्यही महत्त्वाचे म्हणावे लागेल.

पी.व्ही.नरसिंह राव यांचे सरकार आले तेव्हा अर्थमंत्री कोणाला नेमायचे हा प्रश्न होता कारण देश वित्तीय अडचणीत सापडला होता. त्यावेळी अनेकांनी या पदी अर्थशास्त्रातील तज्ज्ञ माणसाची नेमणूक करण्याचा सल्ला दिला. थोडक्यात ही राजकीय नियुक्ती होऊ नये, असे अनेकांचे मत होते. प्रश्न बिकट बनण्याचे एक कारण असेही होते की, तेव्हा आपल्याकडे केवळ तीन आठवड्यांची आयात भागवता येईल एवढेच परकीय चलन उपलब्ध होते. तातडीने पावले उचलणे गरजेचे होते. त्यातही परकीय चलनासाठी कर्ज घेणे आणि पूर्वी जागतिक बँकेसारख्या वित्तसंस्थांकडून घेतलेल्या कर्जांची थकबाकी न होऊ देणे आत्यंतिक गरजेचे होते. कारण कर्जाच्या परतफेडीचा हफ्ता दिला नसता तर आपल्यावर थकबाकीदार असल्याचा शिक्का लागला असता. त्यामुळेच सरकारची प्राथमिकता जागतिक बँकेकडून पटकन कर्ज घेण्यास होती. याम ार्गाने परदेशी धनकोंचा हफ्ता भरायचा आणि थकबाकीदाराची नामुष्की टाळायची हाच विचार होता. पण यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी वा जागतिक बँक अशा जागतिक वित्तसंस्थांमध्ये प्रतिमा चांगली असणाऱ्या, वैश्विक पातळीवर आदर असणाऱ्या अर्थतज्ज्ञाची गरज होती. अशी चर्चा सुरू होताच पुढे आलेले पहिले नाव आय.जी.पटेल यांचे होते. त्यावेळी ते लंडन 'स्कूल ऑफ इकोनॉमिक्स'मध्ये अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. मात्र यासंबंधीचा प्रस्ताव दिल्यानंतर त्यांनी आपली असमर्थता दाखवली. त्यानंतर डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव पुढे आले. थोडक्यात त्यांची नियुक्ती होण्यामागे उत्तम अर्थतज्ज्ञ, अर्थप्रशासकीय पातळीवरील सगळी महत्त्वाची पदे भूषवल्याचा अनुभव आणि देशी अर्थकारणाची अत्यंत बारकाईने असणारी जाण हे मुद्दे महत्त्वाचे होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांमध्ये त्यांच्या नावाला प्रतिष्ठा होती. त्यांच्यातील या सगळ्या गुणवैशिष्ट्यांचा देशाला उपयोग झाला आणि मोठ्या आर्थिक संकटातून आपण बाहेर येऊ शकलो. डॉ. मनमोहन सिंग यांच्याविषयी बोलण्यासारखे असे अनेक मुद्दे आहेत. अपूर्व योगदानासाठी देश नेहमीच त्यांचा ऋणी राहील. विनम्र आदरांजली.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

### भारताचे भाग्य विधाते...- डॉ. अशोक चौसाळकर

डॉ. मनमोहन सिंग हे खऱ्या अर्थाने भारताचे भाग्य विधाते होते कारण त्यांनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांमुळे देशात फार मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. आज भारतीय अर्थव्यवस्था जगातील चौथी अर्थव्यवस्था म्हणून मान्यताप्राप्त झालेली आहे. पंतप्रधान म्हणून त्यांनी सुरू केलेल्या 'मनरेगा' आणि अन्न सुरक्षा योजना या देशातील गरिबी हटवण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाच्या योजना होत्या. त्यांनी केलेला अन्न सुरक्षा करार एक मैलाचा दगड म्हणावा लागेल. राजकारणात चांगला मनुष्य आल्यानंतर किती सकारात्मक बदल होऊ शकतात, याचे डॉ. सिंग हे उत्तम उदाहरण होते. त्यानंतरच्या काळामध्ये भ्रष्ट राजकारणामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. पण तरीही गेल्या ३०-३५ वर्षांच्या इतिहासामध्ये ते भारतातील सर्वात नेते होते, ही गोष्ट आपल्याला अमान्य करता येणार नाही कारण त्यांनी कोट्यवधी भारतीयांच्या जीवनात बदल घडवून आणला. मनमोहन सिंग यांनी प्रथम अर्थमंत्री म्हणून आणि नंतर पंतप्रधान म्हणून वेगाने आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. त्यांच्या विरोधकांनाही या सुधारणा पुढे राबवाव्या लागल्या. स्वत: लोकप्रिय पुढारी नसतानाही भारतीय राजकारणाचे स्वरुप योग्यरित्या समजून घेऊन यशस्वीपणे हाताळणी करण्यामध्ये त्यांना चांगले यश मिळाले. काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणामुळे आणि काही नेत्यांनी विचारसरणीचा मुद्दा पुढे आणल्यामुळे सिंग यांच्यापुढे अनेक अडचणी आल्या. म्हणूनच अभिप्रेत असणाऱ्या सगळ्या सुधारणा ते राबवू शकले नाहीत. पण सिंग यांनी भारतीय लोकशाहीच्या परंपरा समृद्ध केल्या, स्वायत्त संस्थांच्या स्वातंत्र्याची बूज राखली आणि संघर्षात्मक राजकारण असतानाही संसदेची प्रतिष्ठादेखील ढळू दिली नाही. हे त्यांचे मोठे यश होते.

# स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या

## गणिती सूत्रे



आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

''गणिताच्या जंगलात जाण्यासाठी सूत्रांची कुऱ्हाड वापरा'' हा सुविचार आपण शालेय जीवनात अनेक वेळा ऐकलेला आहे.

आणि हा सुविचार गणित विषयासाठी गणित स्पर्धांसाठी, गणित विषयांच्या स्कॉलरशिप, बुद्धिमत्ता परीक्षेसाठी, आणि दैनंदिन गणिती व्यवहारासाठी फार महत्वाचा आहे जो विद्यार्थी व जो शिक्षक या सुविचाराप्रमाणे काम करेल तो हमखास गणित व बुद्धिमत्ता विषयात यशस्वी ठरल्याशिवाय राहणार नाही.

गणित हा अत्यंत महत्त्वाचा आणि व्यापक विषय आहे. जो आपल्या दैनंदिन जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये लागू होतो. गणिती सूत्रे म्हणजे गणितीय समस्यांचे सोडवणूक करण्यासाठी वापरली जाणारी संक्षिप्त, सुबोध आणि प्रमाणितपद्धत. प्रत्येक गणिती सुत्र आपल्या विशिष्ट समस्येचे सोडवणूक साधते आणि त्याला एक साधी आणि सुसंगत रूपरेषा प्रदान करते.

या लेखात स्कॉलरशिप परीक्षेत उपयोगी पडतील अशी काही महत्त्वाची सूत्रे देण्याचा प्रयत केला आहे. जेणेकरून आपल्या विद्यार्थ्यांचे गणित आणि बुद्धिमत्ता या विषयाचे गुणवाढविता येतील. (या सुत्रांमध्ये काही चुका असू शकतात)

१. मधला क्रमांक = एकुण अक्षरे+ १ / २
२. मधला क्रमांक एकूण संख्या विषम असलेसच येतो सम असताना नाही
३. एकूण झाडे = रस्त्याची लांबी / दोन झाडातील अंतर + १
४. वर्तुळाकार जागेवर झाडे = वर्तुळाचा परिघ / दोनातील अंतर
५. रस्त्याची लांबी=एकूण झाडे-१× दोनातील अंतर
६. वर्तुळाची लांबी = एकूण झाड×दोनातील अंतर
७.वर्तुळाचा परीघ = २πr (२×२२×r / ७)
८.रांगेत एकूण मुले = मधला क्रमांक×२
९. तुकड्यांची संख्या = कापायची संख्या + १
१०.कापायची संख्या = तुकड्यांची संख्या -१
११. रेषेसाठी गाठी = तुकड्यांची संख्या- १
१२.वर्तुळासाठी गाठी = तुकड्यांची संख्या
१३. त्रिकोणी संख्या = दिलेला पाया×त्या पुढील संख्या / २
१४. हस्तालोंदने = दिलेली संख्या× त्यामागील संख्या / २
१५. चार पायांचे प्राणी = पायांची संख्या - डोक्यांची दुप्पट / २
१६. तीन चाकी सायकली = चाकांची संख्या - सायकलीची दुप्पट
१७.क्रमाने येणाया संख्यांची बेरीज = शेवटची संख्या×त्या पुढीलसंख्या / २
१८. आकृतीवर उभारलेली मुले = प्रत्येक बाजूवर दिसणारे-१×आकृतीची बाजू
१९. क्रमवार विषम संख्यांची बेरीज = (एकूण विषम संख्या)$^2$
२०. क्रमवार सम संख्यांची बेरीज = एकूण संख्या×सरासरी
२१. क्रमवार घन संख्यांची बेरीज (त्या संख्येची बेरीज)$^2$
२२.चौकोनांची संख्या = आडव्याअंकांची बेरीज×उभ्या अंकांची बेरीज
२३.चौरसांची संख्या = आडव्या संख्येच्या वर्गाची बेरीज
२४. (कर्ण)$^2$ = उरलेल्या दोन्ही बाजुच्या वर्गाची बेरीज
२५. एकूण संख्या = मोठी संख्या- लहान संख्या +१
२६. एकूण रेषाखंड = दिलेली संख्या× त्यामागील संख्या / २
२७. सम संख्येच्या पूर्वीच्या सम संख्या = ती संख्या-२
२८.सम संख्येपर्यंतच्या सम संख्या = ती संख्या / २
२९.विषम संख्येच्या पूर्वीच्या विषम संख्या = ती संख्या -२
३०. विषम संख्येपर्यतच्या **विषम संख्या** = ती संख्या+ १ / २
३१. क्रमाने येणाऱ्या संख्यांची बेरीज = (प. संख्या×दू.संख्या)×
३२.वेळ = अंतर / वेग = अंतर / वेळ अंतर= वेग वेळ
३३. जो वार १ तारखेला येतो, तोच वार ८,१५,२२,२९ या तारखेला येतो.
३४. जो वार २तारखेला येतो, तोच वार ९,१६,२३,३०या तारखेला येतो.
३५. जो वार ३ तारखेला येतो, तोच वार १०,१७,२४,३१ या तारखेला येतो.
३६. ३१ तारखेच्या महिन्यात १,२,३ या तारखांचे वार पाच वेळा येतात.
३७. ३० तारखेच्या महिन्यात १, २ या तारखांचे वार पाच वेळा येतात.
३८. २९ तारखेच्या महिन्यात १या तारखांचे जार पाच वेळा येतात.
३९. २८ तारखेच्या महिन्यात कोणताही वार पाच वेळा येत नाही.
४०. लिप वर्षात फेब्रुवारी दिवस २९तर इतर वर्षात२८ असतात.
४१. लिप वर्ष म्हणजे वर्षाला चारने पूर्ण भाग जाणे होय.
४२. इतर वर्षात१ जानेवारीचा वार संपूर्ण वर्षात ५३ वेळा योतो.
४३. लिप वर्षात १ व २ जानेवारीचा वार संपूर्ण वर्षात ५३ खेळा येतो.
४४. ज्या वाराने वर्षाची सुरवात होते त्या वारानेच वर्षाचा शेवट होतो.
४५. लिप वर्षात ज्या वाराने सुरुवात होते त्याच्या पुढील वाराने वर्षाचा शेवट होतो.
४६. जो वार १ऑगस्ट ला येतो, तोच वार १५ ऑगस्टला येतो. तसेच जो वार ५ सप्टेंबरला येतो तोच वार १४ नोव्हेंबरला येतो.
४७. जो वार १ मेला येतो तोच वार २ ऑक्टोंबर व २५डिसेंबरला येतो.
४८. लीप वर्षात जो वार १५ ऑगस्टला येतो त्यापुढील एक वार सोडुन पुढील वार२६ जानेवारीला येतो.
४९. इतर वर्षात जो वार १५ऑगस्टला येतो, त्यापुढील एक वार सोडून पुढील वार २६ जानेवारीला येतो.
५०. यावर्षी झालेली तारीख ज्या वाराला असेल पुढील वर्षी तीच तारीख त्याच्या पुढील वाराला येते. मात्र या तारखांच्या दरम्यान लीप वर्षाचा फेब्रुवारी महिना आल्यास त्याचा पुढील वार सोडून पुढील वार येतो.
५१. कोणत्याही तारखेचा वार काढताना पुढील सांकेतांक वापरा.

**


# पुस्तक परिचय : वाचनीय आणि प्रेरक

## कर्मयोगी

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

प्राथमिक शिक्षणातील कर्मयोगी, हे धीरज वाटेकर लिखित पुस्तक, पेढे ता. चिपळूण येथील श्री परशुराम सान्निध्य निसर्ग पर्यटन केंद्राने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला नामवंत विचारवंत आणि चिपळूणच्या दैनिक सागरचे संपादक निशिकांत जोशी यांची 'कर्मयोगी' - एका अर्पित जीवनाची गाथा, या शीर्षकाची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. प्राथमिक शिक्षक मोरेश्वर महादेव परांजपे हे ज्या गावात नोकरीनिमित्त जातात तेथे तेथील गावकऱ्यांशी एकरूप होतात. त्यांचे मूळ गाव राजापूर तालुक्यातील आडिवरे. तेथून परांजपे मंडळी जगभर पसरली. परांजपे गुरुजींचे घराणे, साने गुरुजींच्या पालगड गावी स्थायिक झाले. परांजपे म्हणजे दुसऱ्यांना जपणारा. परांजपे गुरुजी १९४९ साली प्राथमिक शिक्षक म्हणून त्या काळातील जिल्हा लोकल बोर्डात दाखल झाले. त्यापूर्वी त्यांचे तिसरीपर्यंत शिक्षण कराची या शहरात झाले होते. पेढे परशुराम या शाळेत गुरुजींनी दीर्घकाळ शिक्षक म्हणून काम केले.

गुरुजी सानेगुरुजींचे परमभक्त आहेत. तेच संस्कार त्यांनी आग्रहपूर्वक जपले आणि काही ध्येय समोर ठेवून शिक्षकी पेशात पदार्पण केलेल्या अनेक तरुण शिक्षकांनाही त्यांनी घडविले. मुलांसाठी सोप्या भाषेत सात पुस्तकेही लिहिली. त्यांनी 'सागर'मध्ये काही काळ स्वेच्छेने काम केले होते. ''गुरुजींप्रमाणे सर्व शिक्षकांसह, इतर क्षेत्रांत काम करणाऱ्यांनी ठरवलं तर या देशाचे चित्र बदलेल'' असा विश्वास निशिकांत जोशी यांनी व्यक्त केला आहे. धीरज वाटेकर यांनी आपले 'मनोगत' मांडले आहे. शेवटी धीरज लिहितात, 'गुरुजींच्या संपूर्ण जीवनावर साने गुरुजींच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. शिक्षक हा हुशार असण्यापेक्षा संवेदनशील आणि उत्तरदायी असणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षकाला विद्यार्थ्यांविषयी विशेष कणव वाटणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे आणि त्याकरिता सानेगुरुजी समजून घेणं हाच एक योग्य पर्याय आहे. याच पर्यायावरून चालत जाऊन परांजपे गुरुजींनी आपले एकेचाळीस वर्षांचे प्राथमिक शिक्षकाचे पवित्र कार्य सिद्धीस नेले.' विलास दत्तात्रय महाडिक या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त परांजपे गुरुजींच्या मानसपुत्राने 'गुरुदक्षिणा' या शीर्षकान्वये आपले हृद्य मनोगत मांडले आहे. या पुस्तकाच्या समर्पक, रंगीत मुखपृष्ठाची संकल्पना धीरज वाटेकर यांची आहे.




सुरुवातीला धीरज यांनी परांजपे कुटुंबाची पूर्वपीठिका स्पष्ट केली आहे. परांजपे घराण्याचा शिक्षण हा आवडीचा विषय कसा, हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. मोरेश्वर महादेव परांजपे यांची पालगड ता. दापोली येथील वंशावळ सुरुवातीला दिली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात कोकणातील अनेकजण कराची शहरात स्थायिक झाले होते. महादेव परांजपे यांचे कराची शहरात प्राथमिक शिक्षण आणि नंतरचे फुलट्रेंडपर्यंतचे शिक्षणही झाले होते.

विवाहानंतर महादेव पत्नीसह कराचीला पूर्वीच्या शिक्षकाच्या नोकरीवर रुजू झाले. त्यांच्या पहिल्या अपत्याचा जन्म मोरेश्वर तथा मोरयाचा जन्म २६ जून १९३२ रोजी पालगडला झाला. नंतर त्यांचा बालपणाचा काळ कराचीला व्यतीत झाला. मोरेश्वर अकरा-बारा वर्षांचे असताना, त्यांचे वडील अकाली निवर्तले. कराचीतील अन्य शिक्षकांच्या मदतीतून आणि मार्गदर्शनातून त्यांचे नंतरचे शिक्षण कराचीत झाले. मात्र फाळणीनंतर परांजपे कुटुंब बामोरा बोटीने, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, निर्वासितांच्या प्रचंड गर्दीत चार दिवसांच्या प्रवासानंतर मुंबईत आले. सातवीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर मोरेश्वर यांना प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली.

ग्रामीण भागातील विविध शाळांतील शिक्षकाची नोकरी करताना मोरेश्वर यांना विविध अनुभव प्राप्त झाले. त्यातून त्यांच्यातील शिक्षक घडत गेला. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण क्षेत्रात झालेल्या बदलांना परांजपे गुरुजींनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ट्रेनिंग पूर्ण झाल्यावर त्यांना मुख्याध्यापकपदी नेमले गेले. शिक्षक म्हणून कार्यरत असताना विविध गावांतील विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनी गावकऱ्यांनाही आपल्या आदर्श वर्तनाने आपलेसे केले. पेढे परशुराम पाणकरवाडी येथे त्यांना दीर्घकाळ मुख्याध्यापकपदी कार्य करण्याची संधी मिळाली. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांप्रमाणेच तरुण शिक्षकांनाही आपल्या प्रमाणेच आदर्श शिक्षक होण्यासाठी घडविले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे विविध सेवाभावी संस्थांतील कार्य, दीर्घकाळ सुरू होते. २३ नोव्हेंबर २०११ रोजी त्यांच्या निवृत्त शिक्षिका असलेल्या, पत्नीचे निधन झाले. या दुःखावरही त्यांनी मात करून, आपले समाजकार्य सुरूच ठेवले आहे. पुस्तकातील विविध कृष्णधवल आणि रंगीत छायाचित्रांतून मोरेश्वर महादेव परांजपे यांचे आदर्शवत जीवनचरित्र वाचकांसमोर नेमकेपणाने उलगडते. यामुळेच पुस्तक विलक्षण माहितीपूर्ण, प्रेरक आणि वाचनीय झाले आहे. **

**पुस्तकाचे नाव : प्राथमिक शिक्षणातील कर्मयोगी**
**लेखक : धीरज वाटेकर, ९८६०३६०९४८**
**प्रकाशक : श्री परशुराम सान्निध्य निसर्ग पर्यटन केंद्र, पेढे ता. चिपळूण जि.रत्नागिरी.**
**प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट २०१६ पृष्ठे :१४०**
**मूल्य : रु. १५०/-**

# असा ही रिक्षावाला....

धनंजय शेटये

आपल्या धावपळीच्या जीवनात आपण घड्याळाच्या काट्याप्रमाणे कार्यरत असतो. प्रत्येकजण आपल्या जीवनव्यवहारात व्यस्त आहे. आजुबाजुला काय घडतंय? हे पाहायलाही आपल्याला वेळ नाही. आपल्याला ऑफिसला जायला उशीर होईल म्हणून संकटात असलेल्यांना मदत टाळाणारे बरेच महाभाग पाहायला मिळतात. दुसऱ्याच्या संकटात आपण कोणतीही मदत करायची नाही आणि आपल्या संकटात मात्र सर्व मदतीसाठी धावून आले पाहिजेत ही वृत्ती निर्माण झाली आहे. आपण दुसऱ्याच्या संकटात सह्याद्री पर्वतासारखे पाठीशी भक्कमपणे उभे राहिले पाहिजे. तर आपल्या मदतीसाठी कोण तरी उभा राहील पण आजचा समाज अतिशय एकलकोंडेपणाकडे झुकत चालला आहे. आजकाल सहकार्याची भावना लुप्त होत चालली आहे. प्रत्येकाला इच्छित स्थळी पोहचण्याची घाई असते. वाहनांच्या सुखसोयी उपलब्ध असुनही आपण वेळ वाचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत असतो. आपण वाहनांवर आरुढ व्हायला हवे पण वेगाच्या अधीन होऊन वाहनच कधी कधी आपल्यावर आरुढ होतात. वाहन वेळ वाचविण्यासाठी असतात पण वाचवलेला पुन्हा कशासाठी खर्च करायचा? हे प्रत्येकाला समजायला नको का? मित्रछाया रिक्षावाला म्हणून योगेश नावाचा अतिशय प्रेमळ, माणुसकी जपणारा सहृदयी रिक्षावाला आहे. खेड्यातल्या अतिशय दुर्गम अशा भागात रिक्षाचा व्यवसाय करतो. त्या गावात दिवसातून एकदोनच एस.टी. बस धावतात. तासन्‌तास बसची वाट पाहत बसणारे प्रवासी. आठवडा बाजार म्हटला की आठ ते दहा किलोमीटर दूरवर जावे लागायचे. शिवाय रेशनिंगचे धान्य आणण्यासाठी पण आठवडा बाजाराच्या ठिकाणी जावे लागे. गावात मध्यमवर्गीय गरीब लोक राहत होती. त्यामुळे गरीब सामान्य कुटुंबातील लोकांना रिक्षाचा प्रवासही परवडत नसावा. एखादेवेळी म्हाताऱ्या माणसांना आजारपणात डॉक्टरजवळ नेण्यासाठी योगेशची रिक्षा बोलावली जात असे. पण योगेश माणुसकी जपत होता. बाजारादिवशी गाडी चुकली तर भर ऊन्हातून चाललेल्या म्हाताऱ्या माणसांना आपल्या रिक्षातून घरी आणून सोडायचा कोणी पैसे दिले तर घ्यायचा नाही तर तो मागतही नसायचा.



अण्णा तिवरे वयाची सत्तरी ओलांडलेला अतिशय गरीब माणूस. गावात एकटाच राहायचा. त्याचा मुलगा तरुणपणी वारला होता. बायकोही एका आजारपणात देवाघरी गेली होती. अण्णा बाजारहाट स्वतः करायचा. आठवडा बाजाराला जाऊन हवे ते सामान घेऊन यायचा. संजय गांधी निराधार योजनेचे पैसे मिळायचे त्यावर त्याचा कसाबसा उदरनिर्वाह चालायचा. कधी कधी आजारपणाच्या औषधपाण्यासाठी पैसे खर्च व्हायचे. आज आठवडा बाजार होता. अण्णाजवळ रेशनिंग बाजाराएवढेच पैसे शिल्लक होते. अण्णाने बाजार घेतला अन् बसला पैसे नसल्याने बाजाराची मोठली डोक्यावर घेऊन घरच्या वाटेने चालायला निघाला.

गावाच्या रस्त्याने चालला होता. भर दुपारच्या उन्हात एक दोन किलोमीटर रस्ता चालून त्याला भोवळ आली होती. रस्त्याच्या कडेला कसाबसा येऊन पडला होता. निर्मनुष्य रस्ता. बराचवेळ झाला होता त्यावाटेने कोणीही फिरकला नव्हता. योगेश रिक्षावाला त्याच दिशेने भाडं सोडून चालला होता. अण्णाला पाहुन रिक्षा थांबवली. अण्णा बेशुद्ध अवस्थेत निपचित पडला होता. योगेशने क्षणाचाही विलंब न करता अण्णाला उचलून आपल्या रिक्षेत बसवले व रिक्षा हॉस्पिटलच्या दिशेने पळवली. योगेशने अण्णाला कसाबसा अक्षरशः उचलूनच हॉस्पिटलच्या दिशेने धाव घेतली. डॉक्टरांनी लगेचच उपचाराला सुरुवात केली. अण्णाचा जीव वाचवण्यासाठी एक महत्त्वाची शस्त्रक्रिया करावी लागणार होती. त्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत खर्च होणार होता. अण्णाजवळ बसच्या भाड्यासाठी पैसे नव्हते तो एवढे पैसे कुठून देणार होता? त्याच्या वाट्यालाही कोण अशा परिस्थितीत मदतीसाठी उभा राहणारा नव्हता. योगेशने थोडासा विचार केला. योगेशजवळही एवढी रक्कम नव्हती. योगेशच्या गळ्यात दोन तोळ्याची सोन्याची चैन होती. अण्णांचा जीव वाचणं महत्वाचे होते. चैन काय कधीही बनविता येईल. परंतु एखाद्याचा जीव परत मिळवता येणार नव्हता. तो लागलीच आपली सोन्याची चैन मित्राजवळ गहाण ठेवायला देऊन पैशाची व्यवस्था केली. डॉक्टरांनी वेळीच उपचार करुन अण्णाचा जीव वाचला होता. योगेश रिक्षावाल्यासारखा देवमाणूस मदतीला धावला नसता तर होत्याचं नव्हतं झालं असतं. पण योगेश रिक्षावाल्याच्या मदतीमुळे अण्णा तिवरेला जणू पुनर्जन्मच लाभला होता. गावात ही बातमी अगदी वाऱ्यासारखी पसरली. योगेशच्या देवत्वाचे जो तो कौतुक करु लागला. अनेक संघटनांनी योगेशचा जाहीर सत्कार केला. सरपंचांनी योगेशच्या देवत्वाचे कौतुक करुन वाहवा केली. अण्णाला समजताच अण्णाच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. आज मुलगा नसला म्हणून काय झाले? मला योगेश रुपी मुलगा सापडला असे अण्णा सर्वांना सांगत सुटला होता. आजच्या काळात पोटची मुलं आपल्या आईबापांना सांभाळताना टाळाटाळ करीत असतात. अनेक कारणे सांगत असतात. पण योगेश सारखा दिलदार व्यक्तिमत्त्वाचा माणूस पाहिल्यावर आजही माणुसकी जीवंत आहे याचा प्रत्यय येतो. योगेश आपल्या गळ्यातील सोन्याची चैन गहान ठेवून मानवता, माणुसकी जपण्याचा प्रयत करताना एकच म्हणावं लागेल असा रिक्षावाला होणे नाही....!!



# चला फिरायला!



ट्रॅव्हल व्हिजन
विनायक दळवी

पर्यटनासाठी निमित्त लागत नाही. तरीही माझ्यासाठी क्रीडापत्रकारिता हे निमित्त ठरेल. माधव गडकरी आणि कुमार केतकर या दोन खात्यनाम संपादकांसोबत लोकसत्ता आणि दिव्यमराठी (दैनिक भास्कर) तब्बल तीन दशके काम केले. या दोन महान संपादकांनी स्वत:जग पालथे घातले होते. प्रत्यक्ष स्थळी जाऊन केलेल्या वार्तांकनाचे महत्व त्यांनी आधोरेखित केले होते. त्यामुळे मला भारतात आणि परदेशात सातत्याने दौरे करण्याची संधी मिळत गेली. अमेरिका आणि लॅटिन अमेरिका पासून थेट न्यूझीलंडला डनेडिन पर्यंत आणि चीनपासून वेस्ट इंडिज बेटांपर्यंतचा अविरत प्रवास हा मला विविधांगी अनुभवाने समृद्ध करीत गेला. निवृत्तीनंतर 'कृषीवल' दैनिकाने क्रीडा पत्रकारितेचा माझ्या कारकिर्दीत खंड पडू दिला नाही. कालपरवाच झालेल्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारताची माजी धावपटू पी.टी. उषा हिने भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनची अध्यक्षा या नात्याने 'कृषीवल' दैनिकाच्या ८८ वर्षांच्या अविरत सेवेचा उल्लेख करून पॅरिस ऑलिम्पिक अधिस्वीकृतीसाठी शिफारस केली, त्यावेळी वर्तमानपत्रांची महती कळली.

ही प्रस्तावना यासाठी, कारण खेळांचे, क्रिकेटचे कव्हरेज करता करता, दोनशेहून अधिक देशांचा, तेथील लोकांचा प्रत्यक्ष, थेट संबंध आला. बोलीभाषेपेक्षा देहबोली किती प्रभावी माध्यम ठरू शकते हे गेली तीन दशके मी अनुभवतोय. वेस्ट इंडिजमध्ये सुभाष गुप्ते यांच्या कॅरिबियन द्विपसमूहावरच्या वंशांच्या, पत्नीने कॅरल गुप्ते यांनी जेव्हा पुरणपोळी आणि वरण-भाताचा बेत केला होता तेव्हा आश्चर्य वाटले होते. तो काळ भारतीय खाद्यसंस्कृती कॅरिबियन बेटांवर फारशी प्रचलित नव्हती तो होता. रिओ ऑलिम्पिकला जेव्हा स्थानिक लोकांच्या संभाषणांमध्ये पाव, चावी, बटाटा, अननस असे अनेक मराठी शब्द ऐकल्यानंतर प्रथम आश्चर्य वाटले होते.

याउलट चीनमध्ये होते. १९९० च्या एशियन गेम्ससाठी गेलो होतो तेव्हा भारतीय पदार्थ मिळणे महाकर्मकठीण काम होतं. नंतरच्या २००८ च्या ऑलिम्पिकच्या वेळी मात्र हे चित्र साफ बदलले होते. प्रभादेवीचा कामत किंवा पुण्याचे सद्‌गृहस्थ जेव्हा भारतीय रेस्टॉरंट्सची मालिकाच चालवित होते. भाषेची अडचणे तेव्हाही होती आत्ताही आहे. इंग्रजी जाणणारे कमीच. मात्र संपूर्ण युरोप खंडात, आशियाई देशांमध्ये परिस्थिती कमालीची पालटली आहे. भारतीय खाद्यपदार्थ मिळतातच पण भारतीय वंशांचे किंवा नेपाळ, बांगलादेशाचे श्रीलंकन लोकही इंडियन फुड्सच्या नावाखाली सर्वत्र फिरायला लागले आहेत.जग त्यामुळे अधिक जवळ आले आहे. भारत ही पर्यटनासाठी मोठी व्यापारी पेठ आहे हे कळल्यापासून चक्क अमेरिका, युरोप, पूर्व आशिया खंड, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड या देशांनीही भारतीयांसाठी आपल्या देशांची दारे खुली केली आहेत. नव्वदहून अधिक देशांनी भारतीयांसाठी 'व्हिसा' 'फ्री' केला आहे तर काही देशांनी आगमनानंतर तात्काळ भारतीयांना व्हिसा देण्याची तयारी दर्शविली आहे.

परदेशातील अनेक विमान कंपन्यांनी भारतात आपली विमाने, प्रवासासाठी नियमितपणे सुरू केली आहे. काही देशांमध्ये दिवसाला ७ ते १० विमाने जात-येत असतात. पर्यटन हंगामात तर ही संख्या वाढते आणि सवलतींचाही भारतीयांवर वर्षाव होतोय. याचे मुख्य कारण म्हणजे, भारतीयांची प्रवासाची आवड. अगदी काटकसर करून पै-पैसे साठवून दर-दोन-तीन वर्षाला परदेश पर्यटनाला जाणारी अनेक भारतीय कुटुंबे आहेत. त्याचप्रमाणे भारतीयांना सारं काही सोप करून त्यांच्या सोयीचे अन्न व भारतीय गार्डन देऊन 'टूर' करणाऱ्या कंपन्यांची संख्या शेकड्यात भरते. 'डेस्टिनेशन वेडिंग' चे पर्यायही अनेक देशांच्या पर्यटन मंडळांनी भारतीयांसमोर ठेवले आहेत. त्यामध्ये 'अंडरवॉटर मॅरेज' चा फंडाही आकर्षणाचे केंद्र ठरला होता.

भारतातील पर्यटनाची व्याख्याही हळूहळू बदलत चालली आहे. देशांतर्गत विमान प्रवास स्वस्त, सुटसुटीत आणि अनेक पर्याय उपलब्ध असणारा झाला आहे. प्रत्येकाच्या खिशाला



परवडतील असे पॅकेजेस सरकारच्या कंपन्यांपासून भारतीय रेल्वे आणि खाजगी कंपन्यांनी मार्केटमध्ये आणले आहेत. वैयक्तिक पर्यटन व्यवस्थेचा नवा फंडाही सध्या लोकप्रिय ठरत आहे.स्वतःला हवे असलेले पॅकेजेस तयार करून देणारे जसे आहेत तसेच स्वतःच स्वतःची बुकिंग करून फिरणारे भारतीयही अनेक आहेत. इंटरनेटचा परिपूर्ण वापर आणि विमान प्रवासापासून रेल्वे, बस व खाजगी कारचे पर्याय सध्या उपलब्ध आहेत. वेळेत किंवा बऱ्याच वेळेआधी बुकिंग केल्यास प्रचंड फायदा होतो हे गुपितही सर्व फिरस्त्यांना ठाऊक झाले आहे. त्यामुळे निश्चित असे ठिकाण डोक्यात असल्यास प्रथम प्रवास व्यवस्था व हॉटेल बुकिंग करून स्वस्त आणि मजेत फिरणारेही बरेच आहेत. फिरण्यासाठी कोणत्या हंगामात कुठे जायचे याचाही सर्वांचा दांडगा अभ्यास आहे. मुलांच्या परिक्षांचा व्याप नसल्यास इतरांच्या परिक्षेच्या हंगामात प्रवास स्वस्थ, सुटसुटीत आणि आरामदायी होतो. तसेच भारतात परिक्षा संपल्यानंतर शाळा सुरू होण्याच्या सुमारापर्यंत फारसा प्रवास न करणारे सुज्ञही भारतात आहेत. यामुळे मनस्ताप टाळता येतो आणि खिशालाही चाट पडत नाही.इंटरनेटमुळे सर्व माहिती आता एका 'क्लिक' वर मिळू शकते. त्यामुळे परदेशात फिरणेही पूर्वीप्रमाणे कठिण वाटत नाही. त्या त्या देशांचे 'व्हिसा' देण्याबाबतचे नियम, तेथील चलनाची भारतीय रूपयांमधील किंमत, प्रवास व्यवस्थेसाठीचे स्वस्त, मार्ग व हंगाम 'ई व्हिला' मुळे बऱ्याच देशांच्या कार्यालयापर्यंत किंवा इतावासापर्यंत आत्ता जावे लागत नाही. व्हिएफएस ग्लोबलसारख्या आणखीही काही कंपन्या सारं काही सुकर करून देतात. व्हिसासाठीची सारी आवश्यक कागदपत्रे जमा करणे अधिकच सोपे झाले आहे. व्हिसाप्रमाणेच प्रत्येक देशासाठी प्रवास विमा कोणता व किती रक्कमेचा लागतो, विमान प्रवासासाठीचे नियम काय आहेत, किती परकीय चलन बाळगणे गरजेचे आहे आणि जास्तीत जास्त किती रक्कम नेता येते हे पडताळून पाहता येतात. त्यामुळे नंतर धावपळ होत नाही. काही देशांमध्ये प्रवेश करण्याआधी काही विशिष्ट लशी घेणे बंधनकारक असते. पण ती माहिती आणि त्या लशी कुठे, कधी व किती किंमतीत घेता येतात ही माहिती देखील आता सहज उपलब्ध आहे.अनेक 'दूर कंपन्या' हे सोपस्कार स्वतः करून देतात व त्याचा अल्प मोबदलाही घेतात. काही वेळा कार्यालयात किंवा आपल्या समाजात अशा कामाची माहिती असणारे लोकही स्वतःच्या सहकाऱ्यांसाठी किंवा समाज समुदाय यांच्यासाठी आपली सेवा देऊन सहकार्य करीत असतात. म्हणजे आपली इच्छा असल्यास जगाच्या पाठीवर कोठेही, कधीही सहज जाता येते. म्हणूनच सध्या भारतात आणि परदेशांमध्ये प्रचंड संख्येने एकत्र फिरणारे अनेक भारतीय आपण पाहतो.आपणही या पर्यटन वारीचे वारकरी होऊ शकता. मार्गदर्शन करणे हे आमचे काम आहे.

**

# निवडक




## पथनाट्य स्पर्धेत गोवे शाळा प्रथम

**कोलाड :** रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्यावतीने रोहा तालुकास्तरावर क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाल्या. सदर स्पर्धेअंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी (लहान गट) पथनाट्य स्पर्धेत राजिप प्राथमिक शाळा गोवे येथील विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण, महिला सुरक्षा, रस्ता सुरक्षा या सामाजिक विषयावर उत्तम प्रकारे पथनाट्य केले.या पथनाट्याच्या जोरावर गोवे शाळेने प्रथम क्रमांक पटकाविला. गोवे शाळा रायगड जिल्हा स्तरावर पथनाट्य स्पर्धेसाठी रोहा तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. राजिप प्राथमिक शाळा गोवे शाळेचा प्रथम क्रमांक आल्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक जयेश महाडिक, सहशिक्षिका रंजना गांधारे, विद्यार्थी, तसेच त्यांना सहकार्य करणारे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व सदस्य आणि पालक वर्ग यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ कै.द.ग. तटकरे सभागृह पंचायत समिती रोहा येथे संपन्न झाला.



## इन्शोरकोट अंतिम फेरीत

**मुंबई: :** इन्शोरकोट, मुंबई महानगर पालिका यांनी मुंबई शहर कबड्डी असो.ने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या विशेष व्यावसायिक गटात अंतिम फेरीत धडक दिली. वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर सुरू असलेल्या या पुरुषांच्या उपांत्य सामन्यात इन्शोरकोट स्पोर्ट्सने पी. डी. हिंदुजा रुग्णालयाला ३५-१४ असे सहज नमवित अंतिम फेरी गाठली. पहिला लोण देत इन्शोरकोटने मध्यांतराला १९-०८ अशी आघाडी घेतली. आदित्य शिंदे, विजय या विजयाचे शिल्पकार ठरले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई महानगर पालिकेने मध्य रेल्वेचे आव्हान २८-११ असे संपविले. पूर्वार्धात १४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या पालिकेने उत्तरार्धात आपला खेळ आणखी उंचावत १७ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. या अगोदर झालेल्या उपांत्य पूर्व सामन्यात पी. डी. हिंदुजाने मुंबई पोलीस ब ला (३२-२२) असे, इन्शोरकोटने माझगाव डॉकला (३८-२२) असे, तर मध्य रेल्वेने न्यू इंडियाला २४-२३ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती.



## करूण नायरचा वर्ल्ड रेकॉर्ड

**मुंबई :** देशांतर्गत क्रिकेटमधील विजय हजारे ट्रॉफीसाठी सुरु असलेल्या वनडे क्रिकेट स्पर्धेत विदर्भ संघाचे नेतृत्व करणाऱ्या करुण नायर याने नवा वर्ल्ड रेकॉर्ड सेट केला आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये नाबाद सर्वाधिक धावा करण्याचा पराक्रम त्याने करून दाखवलाय. ३ जानेवारीला उत्तर प्रदेश विरुद्धच्या सामन्यात विदर्भ संघाकडून खेळताना सलग तिसरे शतक झळकावताना त्याने विश्व विक्रमाला गवसणी घातली. उत्तर प्रदेशच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना विदर्भ संघासमोर ३०८ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावांचा पाठलाग करताना करुण नायर याने ११२ धावांची दमदार खेळी केली. या सामन्यात नायर चार सामन्यात पहिल्यांदा बाद झाला. बाद होण्याआधी त्याने यश राठोडच्या साथीनं पहिल्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचली. या सामन्यात नायरनं ७० धावांचा आकडा गाठताच सलग नाबाद खेळीसह लिस्ट ए क्रिकेटमध्ये ५०० धावा करणारा तो पहिला भारतीय ठरला.



## चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी श्रेयसची दावेदारी

**मुंबई :** विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत मुंबईचा कॅप्टन श्रेयस अय्यर याने धमाकेदार शतकी खेळी साजरी केली. एका बाजूला सूर्यकुमार यादव याच्यावर गोल्डन डकची नामुष्की ओढावली असताना दुसऱ्या बाजूनं तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश करत अय्यरच्या भात्यातून आलेल्या शतकाच्या जोरावर मुंबईच्या संघाने पुदुच्चेरी विरुद्धच्या सामन्यात निर्धारित ५० षटकात २९० धावांपर्यंत मजल मारली होती. पदुच्चेरी संघ २७.२ षटकात १२७ धावांवर आटोपला. मुंबईच्या संघानं हा सामना तब्बल १६३ धावांनी जिंकला. श्रेयस अय्यरचं विजय हजारे वनडे स्पर्धेतील हे दुसरे शतक आहे. त्याने या शतकी खेळीच्या जोरावर चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आपली दावेदारी भक्कम केली. याआधी कर्नाटक विरुद्धच्या स्पर्धेत सलामीच्या लढतीत अय्यरच्या भात्यातून ११४ धावांची खेळी आली होती. याशिवाय हैदराबादविरुद्धही त्याने ४४ धावांची लक्षवेधी कामगिरी नोंदवली होती. श्रेयस अय्यरनं केलेल्या १३७ धावांशिवाय अथर्व अंकोलेकर याने ४७ चेंडूत ३ षटकार आणि २ चौकाराच्या मदतीने ४३ धावांच योगदान दिले.

### पंतची फिप्टी; जडेजा-सुंदर नाबाद

# सिडनी टेस्टमध्ये भारताची आघाडी

**| सिडनी | वृत्तसंस्था |**

**बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या ५व्या कसोटीत भारत ऑस्ट्रेलियापेक्षा १४५ धावांनी पुढे आहे. शनिवारी दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत संघाने ६ गडी गमावून १४१ धावा केल्या होत्या. रवींद्र जडेजा ८ धावांवर आणि वॉशिंग्टन सुंदर ६ धावांवर नाबाद माघारी परतले.**



भारतीय संघाकडून ऋषभ पंतने सिडनीमध्ये ३३ चेंडूत ६१ धावा केल्या. यशस्वी जैस्वालने २२ धावांचे योगदान दिले. केएल राहुल आणि शुभमन गिल १३-१३ धावा करू शकले. विराट कोहलीने ६ धावा केल्या. स्कॉट बोलंडने ४ बळी घेतले.

चहापानाच्या विश्रांतीपूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात १८१ धावांवर सर्वबाद झाला होता. येथे भारताकडे पहिल्या डावात ४ धावांची आघाडी होती. भारताने पहिल्या डावात १८५ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून पदार्पण सामना खेळत असलेल्या ब्यू वेबस्टरने सर्वाधिक ५७ धावा केल्या. स्टीव्ह स्मिथने ३३ आणि सॅम कोन्स्टासने २३ धावा केल्या. प्रसिध कृष्णा आणि मोहम्मद सिराजने प्रत्येकी ३ बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि नितीश रेड्डी यांनी २-२ विकेट घेतल्या.

### बुमराहला साइड स्ट्रेनचा त्रास

भारतीय कर्णधार जसप्रीत बुमराहने शनिवारी सिडनी कसोटीच्या दुसऱ्या दिवशी खेळ सोडला आणि मैदानाबाहेर गेला. त्याला स्कॅनिंगसाठी नेण्यात आले आहे. त्याला साइड स्ट्रेनचा त्रास होत आहे. बुमराहच्या अनुपस्थितीत विराट कोहली कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत आहे. दुसऱ्या दिवशी उपाहारानंतर बुमराहने एक षटक टाकले. त्यानंतर त्याला थोडी अस्वस्थता वाटली आणि कोहलीशी बोलल्यानंतर तो मैदानाबाहेर गेला. त्यानंतर ब्रॉडकास्टरने त्याला संघ सुरक्षा संपर्कअधिकारी अंशुमन उपाध्याय आणि टीम डॉक्टरांसह स्टेडियम सोडताना दाखवले. जसप्रीत बुमराह सिडनी कसोटीत भारताचे नेतृत्व करत होता. कसोटीच्या पहिल्या दिवशी बुमराह ब्लेझर परिधान करून भारताच्या नाणेफेकीसाठी आला.

## पॉवरलिफ्टींग स्पर्धेचे आयोजन

**नवीन पनवेल :** रायगड जिल्हास्तरीय क्लासिक पॉवरलिफ्टींग स्पर्धा पनवेल येथे होणार आहेत. या स्पर्धा सब ज्युनिअर,सीनिअर, ज्युनिअर आणि मास्टर्स पुरुष आणि महिला अशा प्रकारे स्पर्धा होतील. या स्पर्धा पनवेल शहरातील पनवेल - उरण आगरी समाज मंडळाच्या महात्मा जोतिबा फुले सभागृह येथे होतील. शनिवार ११ जानेवारी रोजी येथे सकाळी ८ वा.सुरू होणार आहेत.या वेळी अनेक नामवंत व्यक्ती उपस्थित राहणार असून त्यांना माहिती पत्रक देण्यात आले आहे. या स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी संघ निवड होणार आहे. असे स्पर्धा प्रमुख प्रसिद्ध राष्ट्रीय पॉवरलिफ्टींग ज्येष्ठ खेळाडू माधव पंडित आणि खजिनदार राहुल गजरमल यांनी कळविले आहे. तसेच या स्पर्धा साठी निरीक्षक म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त व महाराष्ट्र राज्य संघटनेचे सचिव संजय प्रतापराव सरदेसाई हे हजर राहणार आहेत. जिल्ह्यातील संलग्न असलेल्या जिम, व्यायाम शाळा,संस्था यांनी आपल्या खेळाडूंची नोंदणी योग्य वेळेत करावी.असे कळविले आहे.

# अलिबागमध्ये रंगणार क्रिकेटचा थरार

### • मैदानात आयोजकांकडून तयारीला सुरुवात

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्ष,पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबाग आयोजित अलिबाग चॅम्पीयन ट्रॉफी २०२५ नाईट टेनिस क्रिकेट लीग क्रिकेट स्पर्धेचा थरार अलिबागमधील क्रीडा भवनमधील मैदानात रंगणार आहे. नऊ ते अकरा जानेवारी असे तीन दिवस होणाऱ्या स्पर्धेच्या निमित्ताने मैदानात तयारीला सुरुवात झाली आहे. मैदान तयार करण्यापासून व्यासपीठ उपलब्ध करण्याचे काम वेगाने सुरु आहे. या स्पर्धेसाठी अवघे दोन दिवसच शिल्लक राहिले असून

अलिबागकरांसह जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील क्रीडाप्रेमींना आयपीएलच्या धर्तीवर क्रिकेटचा आनंद घरबसल्यादेखील घेता येणार आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष



प्रशांत नाईक यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा भरविला जाणार आहे. या स्पर्धेचे हे दुसरे पर्व असणार आहे. स्पर्धेत निमंत्रित सोळा संघ आहेत. त्यामध्ये साखरमधील प्रदिप स्पोर्ट्स, अलिबागमधील कुबेर इलेव्हन, अलिबागमधील यु.व्ही. स्पोर्ट्स, अलिबागमधील आर्यन स्ट्रायकर्स, अलिबागमधील फैझी इलेव्हन, नवगांवमधील रियांश इलेव्हन, वरसोली येथील त्रिश्राव्या इलेव्हन, आंबेपूरमधील एस.पी. सुपर प्लेअर्स, म्हात्रोळी येथील आद्य सप्लाअर्स, थळमधील एम.डी. वॉरिअर्स, नागाव येथील सिया वॉरिअर्स, साखरमधील नाखवा वॉटर स्पोर्ट्स, अलिबागमधील ए.बी. ग्रुप, साखरमधील प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्ट्स, अलिबागमधील जे.डी. भार्गवी इलेव्हन, दिघोडीमधील अर्जून इलेव्हन या संघाचा समावेश आहे. नव्या २०२५ वर्षाच्या सुरुवातीला अलिबागमध्ये क्रीडाभवन येथे नऊ ते अकरा जानेवारी अशी तीन दिवस नाईट क्रिकेट स्पर्धा होणार आहेत.

अलिबाग तालुका मर्यादीत या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला दोन लाख रुपये, व चषक, द्वितीय क्रमांकाला एक लाख रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेतील मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे. ही स्पर्धा प्रो लिंक स्पोर्ट्स व एफएच स्पोर्ट्सवरदेखील पहाता येणार आहे. ही स्पर्धा सुरु होण्यासाठी अवघे दोन दिवसच शिल्लक राहिले आहेत. तिसऱ्या दिवशी म्हणजे नऊ जानेवारीला सायंकाळी स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेची तयारी आयोजकांकडून सुरु करण्यात आली आहे.

# राजपूरीमध्ये क्रिकेटचा थरार

### शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

श्री बाळ गणेश क्रिकेट मंडळ राजपूरी कोळीवाडी आयोजित विष्णूदेवा क्रिकेट संघ राजपूरी तर्फे तीन दिवस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी ११ जानेवारीला सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास स्पर्धेला सुरुवात होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील महादेव कोळी समाज राजपूरी अध्यक्ष रमेश पाटील यांच्या उपस्थित होणार आहे.

श्री बाळ गणेश प्रिमिअर लिग २०२५ ही क्रिकेट स्पर्धा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थित पार पडणार आहे. १३ जानेवारीला अंतिम सामना झाल्यावर विजेत्या संघाला आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबईचे चेअरमन विजय गिदी, महादेव कोळी समाज राजपूरी उपाध्यक्ष घनश्याम घागरी, राजपूरी ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया गिदी यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण होणार आहे. तीन दिवस होणाऱ्या क्रिकेट स्पर्धेच्या वेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, वामन चुनेकर, मनोहर बैले, निता गिदी, तुकाराम पाटील, किशोर चवरकर, चंद्रकांत कमाने, लियाकत कासकर, हिरकणी गिदी आदी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून स्पर्धेला शुभेच्छा देणार आहेत.

# वावेखारमध्ये क्रिकेट स्पर्धा

### चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

आई काळकाई क्रिकेट क्लब वावेखार आयोजित जय शिवराय असोसिएशन तर्फ ओव्हर आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि.०५) सकाळी वावेखार येथे मैदानात ही स्पर्धा सुरु होणार आहे. शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्र-लेखा पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यावेळी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक गणेश मढवी, अलिबाग मजूर फेडरेशनचे चेअरमन हेमंत ठाकूर, माजी सरपंच राम गिजे, संतोष घाणेकर, जगदीश घाणेकर आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघाला १५ हजार रुपये व चषक द्वितीय क्रमांकाला दहा हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला सात हजार रुपये व चषक तसेच उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज व मालिकावीर यांना चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत पंचाचा निर्णय अंतिम राहिल. सामन्यात फेरबदल करण्याचा निर्णय कमिटीकडे राहिल अशा नियम अटी लागू करण्यात आल्या आहेत.

## गांगुलीची मुलगी अपघातात वाचली!

**दिल्ली :** भारताचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा माजी अध्यक्ष सौरव गांगुली मुलगी सना गांगुली मोठ्या अपघातापासून थोडक्यात वाचली आहे. शुक्रवारी रात्री तिच्या कारला अपघात झाला. मिडिया रिपोर्ट्सनुसार शुक्रवारी संध्याकाळी हा अपघात झाला. सना प्रवास करत असलेली कार आणि बस यांच्यात बेहला चौरस्ता भागात धडक झाली. गांगुलीच्या घराच्या काही मीटर अंतरावरच बेहला चौरस्ता आहे. पोलिसांनी माहिती दिली की रायचक-कोलकाता या मार्गावरून जाणाऱ्या बसने कारला धडक दिली. या धडकेच कारची साईड मिरर आणि काच तुटली. कारचे बरेच नुकसान झाले.

# दिल्लीत रंगणार पहिला खो-खो वर्ल्ड कप

**| दिल्ली | वृत्तसंस्था |**

खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाफर्तफे (केकेएफआय) भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (एसएआय) साहाय्याने १३ ते १९ जानेवारी दरम्यान दिल्लीत पहिली खो-खो विश्वकरंडक स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेतील करंडकाचे केकेएफआयतर्फे शुक्रवारी अनावरण करण्यात आले.




दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडिअम येथे होणाऱ्या खो-खो विश्वकरंडकात २४ देशांतून आलेले पुरुषांचे २१ तर महिलांचे २० संघ खेळणार आहेत. पुरुषांच्या स्पर्धेसाठी निळा, तर महिलांच्या स्पर्धेसाठी हिरवा करंडक आहे. तेजस आणि तारा नामक हरिण या स्पर्धेचे शुभंकर आहेत. केकेएफआयचे अध्यक्ष सुधांशू मित्तल म्हणाले, या स्पर्धा डिस्ने प्लस हॉटस्टारवर लाइव्ह, तसेच डीडी स्पोर्टसवर मोफत दाखवल्या जाणार आहेत. खो-खो खेळाला ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळावे यासाठीचे हे पहिले पाऊल आहे. फेडरेशनचे सरसचिव एम. एस. त्यागी म्हणाले, या स्पर्धेस २४ देशांकडून मिळालेला प्रतिसाद या खेळाची विश्वाभिमुखता दाखवतो.

खो-खो विश्वकरंडक स्पर्धा पहिल्यांदाच खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेत विविध ६ खंडातील संघ सहाभागी होत असून यात आशिया, दक्षिण व उत्तर अमेरिका, युरोप, आफ्रिका आणि ओशिनिया या खंडांचा सम ावेश आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान संघात पहिला सामना १३ जानेवारीला होईल.

### जिल्ह्यातील पहिली शिक्षक क्रीडा स्पर्धा | ३०० हून अधिक शिक्षकांचा सहभाग

# शिक्षक रमले मैदानी खेळांमध्ये

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अध्ययन करणारे शिक्षक आज चक्क मैदानावर खेळांमध्ये रमले. रायगड जिल्ह्यातील पहिल्या तालुकास्तरीय शिक्षक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तब्बल ३३० शिक्षक हे मैदानी खेळांमध्ये सहभागी झाले.**

कर्जत तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाचे वतीने तालुक्यातील २८० जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण देणारे शिक्षक यांच्यासाठी शिक्षक क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कर्जत तालुका पंचायत समितीने एक आगळावेगळा उपक्रम सुरू केला असून तालुका शिक्षक क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.नेरळ जवळील वंजारपाडा



येथील माथेरान व्हॅली स्कूल येथे आयोजित स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षण अधिकारी सुनील भोपळे यांचे हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले.

कर्जत तालुका शिक्षक क्रीडा स्पर्धेची संकल्पना मांडणारे कर्जत तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड, तसेच शिक्षण विभागाचे बीट विस्तार अधिकारी अरुण पारधी, देविदास जाधव, तालुका समन्वयक किशोर पाटील, समीर येरुणकर, पेण शिक्षक पतपेढी अध्यक्ष गजानन घरत, उपाध्यक्ष मोहन पाटील, केंद्रप्रमुख गंगावणे, संदीप पाटील, केंद्र प्रमुख खाडे, सोनावळे रवींद्र भोईर, माथेरान व्हॅली स्कूलच्या मुख्याध्यापक मृदुला पटेल, शिक्षक समिती जिल्हा उपाध्यक्ष तानाजी गवारी, तालुका अध्यक्ष शैलेश जामघरे, जुनी पेन्शन संघटना जिल्हा अध्यक्ष मंदार रसाळ, शिक्षक भारती तालुका अध्यक्ष दिनेश घुडे, उर्दू संघटना लोगडे, आदी देखील उपस्थित होते.

या शिक्षक क्रीडा स्पर्धेसाठी परीक्षक भाकरीपाडा शाळेचे शिक्षक यशवंत वाघरे तसेच राष्ट्रीय पंच नेरळ विद्या मंदिरचे जयवंत पारधी, एल ए ई एस स्वप्नील नामदास, विशाल राठोड, नेरळ विद्या विकासचे नितीन सुपे यांनी काम पाहिले.

जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभाग शिक्षण अधिकारी सुनील भोपळे यांनी यावेळी शिक्षक खेळाडू यांना मार्गदर्शन करताना या ठिकाणी आल्यावर चांगला क्रीडा स्पर्धा शिक्षकांसाठी होणारी ही स्पर्धा होत आहे. जिल्ह्यात अशी स्पर्धा कधीही झालेली नाही मात्र पुढील वर्षापासून रायगड जिल्ह्यात अशा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाईल. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड हे देखील शिक्षक वर्गाबद्दल सहनभुती असलेले सनदी अधिकारी आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद असा निर्णय घेण्याचा प्रयत्न होईल असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)